
म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा वा
दा. क्र. ३९




BVBK-0400039

पं. महादेवशास्त्री जोशी

कि.

बा. वा.

नो. क्र. ३९

| | | |
|---|---|---|
| क्र. | ३९ | |
| वि. | किशोर | १८. |

# भारताचे कंठमणी

# [१]

पं. महादेवशास्त्री जोशी

मूल्य पाच रुपये

जोशी ब्रदर्स, पुणे २

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. गीतारहस्याचा जन्म | .... | १ |
| २. बापूजी निघाले दिल्लीला | .... | ८ |
| ३. वीरगर्जना—वीरमरण ! | .... | १३ |
| ४. वंगभंगाचा काव्यमय उद्रेक | .... | २१ |
| ५. एक सत्यनिष्ठ समर्पित जीवन | .... | २६ |
| ६. धर्मनिष्ठेचा आदर्श | .... | ३६ |
| ७. रोजनिशी; पण तुरुंगातली | .... | ४६ |
| ८. आर्यसमाजाचा जनक | .... | ५४ |
| ९. माझ्या मुखाने भारत बोलतो | .... | ६१ |



प्रकाशक : केशव वामन जोशी, २५ बुधवार पेठ, अप्पा बळवंत चौक, पुणे २

मुद्रक : शशिकान्त महादेव देव, सुलभ मुद्रणालय, २९१ शनिवार, पुणे ३०

# प्ररोचना

आपला भारत हा एक महान् देश आहे. भौगोलिक निस्ताराने मोठा, तसाच परंपरेनेही मोठा. या देशात असंख्य महापुरुष होऊन गेले. आजही हयात आहेत. या थोरामोठ्यांची तितकीच मोठी चरित्रेही लिहिली गेली आहेत. कोणावर नाटके झाली आहेत, तर कोणावर कादंबऱ्या झाल्या आहेत.

पूर्वजांची चरित्रे ही सर्वांत आवश्यक अशी वाचनीय वस्तू. या वाचनाने कोणाला स्फूर्ती मिळते, कोणाचे आदर्श ठरतात, तर कोणाला मार्गदर्शन होते. महापुरुषांची चरित्र हा भारतीयांचे भारतीयत्व दृढ करण्याचा एक हमखास मार्ग आहे. रामायणाणत राम तर आहेच; पण रावणही आहे. मग आपण रामायण कशासाटी वाचायचे ? रामासारखे वागावे, ते जीवन समृद्ध आणि पुनीत करणारे आहे; अन् रावणासारखे वागता कामा नये, कारण त्यात शेवटी विनाश आहे, सर्वनाश आहे, हे मनावर ठसविण्यासाठी. ते मुद्दाम ठसवावे लागतच नाही. मार्गदर्शन ते हे !

पण महापुरुषांचे हे मोठमोठे चरित्र-ग्रंथ पाहताक्षणीच कुमारवयातल्या मुलांची छाती दडपते. ' अरे बाप रे ! एवढं मोठं चरित्र कसं वाचून व्हायचं ? राहू दे ते. ' अशी भावना कुमार-कुमारिकांच्या मनात उत्पन्न होणे साहजिक आहे.

त्यासाठी मी हा एक नवा मध्यम मार्ग शोधला आहे. यालाच म्हणतात प्ररोचना. एखाद्या मोठ्या व्यक्तीच्या जीवनचरित्रात एक-दोन प्रसंग असे असतात, की ते वाचताच त्या विभूतीचा एकंदर स्वभावधर्म एकदम उजळून निघतो. तो प्रसंग कुमारांच्या मनावर इष्ट तो परिणाम किंवा शुभसंस्कार करू शकतो. त्यातून पुढे समग्र चरित्र वाचण्याची प्रवृत्ती होणेही शक्य असते.

रामायण–महाभारतातल्या गोष्टी सांगून जिजामातेने शिवाजीमहाराजांच्या बालमनावर माणुसकीचे अन् क्षात्रधर्माचे संस्कार केले असे आपण ऐकतो, अन् ती गोष्ट खरी मानतो.

प्रस्तुत पुस्तकांचा हेतूही तोच आहे. हा हेतू माझे मित्र आणि प्रकाशक श्री. केशवराव जोशी यांनाही योग्य वाटला आणि त्यांनी मनावर घेतल्यामुळे ही पुस्तके विद्यार्थ्यांच्या हाती पडत आहेत. विद्यार्थीवर्गाला ही पुस्तके प्रिय होतील अशी आकांक्षा आहे.

पुणे
शके १९००

**महादेवशास्त्री जोशी**



## गीतारहस्याचा जन्म

"ता. १२ मे (१९०८) च्या अंकात टिळकांनी 'देशाचे दुर्दैव' या मथळ्याखाली अग्रलेख लिहिला आणि त्या योगे सरकारबद्दल द्वेष व अपमानबुद्धी लोकांत उत्पन्न झाली. निदान ती उत्पन्न करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. अर्थात हा राजद्रोहाचा गुन्हा होय. तरी १२४ अ व १५३ अ, या कलमांखाली टिळकांचा इन्साफ होऊन योग्य ती शिक्षा व्हावी."

वरील आरोप लागू करून मुंबई सरकारने लो. टिळकांवर खटला भरण्याचे ठरविले. प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट मि. ॲस्टन यांजपुढे फिर्याद दाखल झाली. लगोलग टिळकांना पकडण्याविषयी वॉरंट निघाले. टिळक मुंबईच्या सरदारगृहात होते, तिथे त्यांना पकडण्यात आले.

आपल्यावर खटला भरला जाणार अन् तो थोड्याच दिवसांत, हे टिळकांना आधीच कळले होते. म्हणून ते आठ दिवस अगोदरच मुंबईला जायला निघाले. ते पुण्याच्या स्टेशनवर गाडीत बसणार, एवढ्यात त्यांचा

एक अज्ञात हितचिंतक पुढे आला अन् त्यांना म्हणाला,

"तुम्ही आज मुंबईला जाऊ नका. बहुधा एकदोन दिवसांतच तुमच्यावर वॉरंट बजावले जाईल. तेवढाच एक दिवस तुम्हाला निरवानिरव करण्यासाठी मिळेल."

त्यावर टिळक म्हणाले,

"निरवानिरव कसली करायची अन् तयारी तरी कसली करायची? घरी जाऊन काय फौजफाटा तयार करायचा आहे का हत्ती-घोडे शृंगारायचे आहेत? आपला सर्व देश हाच सरकारने एक मोठा तुरुंग बनविला आहे. प्रत्यक्ष तुरुंगात जायचं म्हणजे एका मोठ्या दालनातून छोट्या दालनात जायचं एवढंच की नाही? ते काही नाही. मी निघालो आहे तो आजच जाणार!"

टिळक मुंबईला गेले अन् नेहमीप्रमाणे सरदारगृहात उतरले. दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे वॉरंट बजावणाऱ्या पोलिसाकडे पाहून टिळक जरा रागातच म्हणाले,

"का हो! वॉरंटावर मॅजिस्ट्रेटची सही होऊन चार तास होऊन गेले. तुमच्या कचेरीपासून सरदारगृह पंधरा मिनिटांच्या रस्त्यावर आहे. असं असता तुम्हाला ते बजावायला चार तास कसे लागतात? लवकर आला असता तर कचेरीच्या वेळेत मला जामिनकीचा अर्ज करायला फुरसत मिळाली नसती का?"

टिळकांचे हे बोलणे मार्मिक तर होतेच; शिवाय त्याला आधारही होता. टिळकांना जामिनकीचा अर्ज करायला कचेरीची वेळ संपण्यापूर्वी सवड मिळू नये, हाच तर सरकारचा कावा होता.

त्यामुळे त्याच दिवशी त्याच रात्री टिळकांना कोठडीबंद व्हावे लागले. न्यायमूर्तींनी टिळकांना जामिनावर सोडायचे नाकारले अन् खटला ऐकण्यासाठी ज्यूरी नेमली. साक्षी-पुरावे अन् जबाब सुरू झाले. ते संपल्यावर

न्यायमूर्ती दावर यांनी टिळकांना म्हटले,

" बचावाचे म्हणून तुम्हांला जे काही बोलायचे असेल, ते आत्ताच सगळे बोलून घ्या. "

टिळकांनी सतत आठ दिवस रोज आपली बाजू साधार, सयुक्तिक अन् कायद्याला धरून मांडली होती, पण तिचा काहीही उपयोग झाला नाही. सरकारी वकिलाने त्याच्या भाषणात टिळक राजद्रोहाच्या गुन्ह्याखाली दोषी आहेत, असा युक्तिवाद केला. न्या. दावर यांनी ज्यूरीचे मत विचारले. ज्यूरीने बहुमताने टिळक दोषी आहेत, असा निर्णय दिला. न्या. दावर त्या निर्णयाशी सहमत झाले. शिक्षा सांगण्यापूर्वी त्यांनी पुन्हा एकदा टिळकांना म्हटले.

" तुम्हाला काही सांगायचं असलं, तर आता हीच वेळ आहे. "

टिळक उठून उभे राहिले. अन् आपल्या स्थितप्रज्ञ वृत्तीने आणि मेघ-गंभीर वाणीने बोलले.

" मला सांगायचं असं फारच थोडं आहे. ज्यूरीनं मला दोषी ठरवलं, तर खुशाल ठरवो. पण मी गुन्हेगार नाही. लौकिक गोष्टींचं नियंत्रण करणारी अशीही एक शक्ती न्यायपीठाहूनही वरिष्ठ आहे. कदाचित् ईश्वराची इच्छाच अशी असेल, की मला शिक्षा व्हावी आणि मी शिक्षा भोगल्याच्या कारणानेच मी अंगीकारलेल्या कार्याला ऊर्जित दशा यावी. "

त्यावर न्यायमूर्तींनी टिळकांना शिक्षा सांगितली ती अशी—

" मी तुम्हांला तुमच्या दोन गुन्ह्यांसाठी सहा वर्षे काळेपाण्याची शिक्षा देत आहे ! "

शिक्षा सांगितल्यावर टिळकांना पिंजऱ्यातून बाहेर काढून कोर्टाच्या मागच्या दाराने खाली आणले. तिथे मोटार गाडी तयारच होती. पोलिसांनी टिळकांना तिच्यात बसवले आणि बी. बी. सी. आय. च्या स्टेशनवर आणले. टिळकांच्यासाठी तिथे स्पेशल आगगाडी तयार होती. तिच्यातल्या एका

बंदिस्त डब्यात पोलिसांनी टिळकांना चढवले. गाडी ताबडतोब निघाली. शिक्षा झाल्याच्या रात्रीच या सर्व घटना घडल्या.

दुसऱ्या दिवशी सकाळी गाडी अमदाबादेपुढच्या साबरमती स्टेशनात आली. पोलिसांनी तिथे टिळकांना उतरून घेतले आणि साबरमतीच्या जेलमध्ये नेऊन कोठडीबंद केले.

पण सरकार टिळकांना फार दिवस तिथे ठेऊ शकणार नव्हते. कारण त्यांची शिक्षा काळेपाण्याची होती. थोड्याच दिवसांत सरकारने त्यांना साबरमतीहून पुन्हा हालवले, गुपचुप मुंबईस आणले अन् लगोलग बोटीत बसवले. बोट सुटली अन् कुठेही न थांबता ब्रह्मदेशात रंगूनच्या बंदरात जाऊन उभी राहिली. तिथून पुढे आगगाडीने मंडालेला प्रयाण !

मंडालेचा तुरुंग तिथल्या किल्ल्यातच एका कोपऱ्यात होता. टिळकांना ज्या कोठडीत ठेवले होते, ती कोठडी दुसऱ्या मजल्यावर असून दोन खणांची होती. आवार मोठे होते; पण दिवस-रात्र आवाराच्या दरवाज्यांना कुलपे असत. खोलीला लाकडी पिंजऱ्याप्रमाणे लाकडी गज होते. टिळकांना स्वयंपाक करून घालायला एक ब्राह्मण कैदी दिलेला होता. मंडाले शहराची हवा अतिशय उष्ण. अष्टौप्रहर जीव घेणारा उकाडा. लाकडी गजांतून आत झळा मारायच्या. अंग कसे होरपळून निघायचे. वरची कौलेही जणू आग ओकायची. गरम वाऱ्याबरोबर धुळीचे लोट आत यायचे. आणि वातावरण अधिकच गुदमरायचे.

हा उकाडा सहन करण्याइतकी टिळकांची प्रकृती ठीक नव्हती. त्यांचा मधुमेहाचा विकार बळावला होता. शरीरात साखरेचे प्रमाण वाढले होते. हिरड्या सुजल्या होत्या. त्यांतून पू निघायचा. कपाळावर फोड उठायचे. शिवाय अंतर्गळाचाही त्रास होताच. मधून मधून तापही यायचा. अशी सगळी परिस्थिती भयावह. आतली आणि बाहेरची. त्याशिवाय पुण्यात टिळकांची पत्नीही मधुमेहाच्या विकाराने आजारी

होती. तिने पथ्यपाणी सोडले होते. ती उदास बसून राहायची. औषधपाणी करायची नाही. हेही टिळकांना तुरुंगात समजले होते. म्हणजे आजाराच्या जोडीला चिंता होती. अशा स्थितीत मनुष्य पार खचून गेला असता आणि कदाचित् त्याने तिथेच देह ठेवला असता.

पण टिळकांना तुरुंगात मरायचे नव्हते. शरीरप्रकृतीची तुरुंगात घेता येणे शक्य होते तेवढी काळजी घ्यायची होती. पण आरामात पडूनही राहायचे नव्हते. या तुरुंगवासाचा त्यांना ग्रंथलेखनासाठी उपयोग करायचा होता. बाहेरच्या धकाधकीत जे जमले नाही, ते तिथल्या एकांतवासात साधून घ्यायचे होते. या ग्रंथाच्या आधारे गीतेचा नवा अन् खरा अर्थ सांगायचा होता. गीतेचे रहस्यच अभिनव पद्धतीने उघडून दाखवायचे होते. पुढच्या अनंत पिढ्यांना प्रेरणा देणारी ठरेल अशी रचना त्या ग्रंथात करायची होती. त्यासाठी त्यांनी पुण्याहून शेकडो ग्रंथ मागविले. संस्कृत तसेच इंग्रजी. टिळक अभ्यासाला लागले. तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास अशा अनेक विषयांवरच्या ग्रंथांचे त्यांनी खोल खोल अध्ययन सुरू केले. कशातून काय घ्यायचे, किती घ्यायचे, कोणाचे खोडून काढायचे, कोणाच्या मतावर जास्त जोर द्यायचा, इत्यादी गोष्टी निश्चित केल्या.

पण केवळ इंग्रजी भाषेतील ज्ञानाने त्यांचे समाधान होईना. फ्रेंच भाषेत गाजलेले तत्त्वज्ञ होते. जर्मन भाषेत जगप्रसिद्ध विचारवंत होते. गीतारहस्यासाठी त्यांच्या विचारांचा परिचय आवश्यक होता. म्हणून त्यांनी फ्रेंच व जर्मन भाषांची प्राथमिक पुस्तके मागवली. त्यांच्या साहाय्याने त्या दोन्ही भाषांतील ग्रंथांचा अभ्यास केला. ग्रंथ वाचून त्यांचा आशय समजेल इतके ज्ञान त्यांनी संपादन केले.

आणि मग टिळक आपला जगप्रसिद्ध गीतारहस्य हा ग्रंथ लिहायला बसले. आपण तोंडाने मजकूर सांगायचा आणि तो लेखकाने लिहून घ्यायचा, अशी त्यांची केसरीच्या प्रारंभापासून सवय होती. कचेरीत

फेऱ्या घालीत ते मजकूर सांगत. या पद्धतीत त्यांच्या वाणीचा ओघ गंगे-सारखा अप्रतिबंध चालू राही.

पण इथे त्यांच्यापाशी कोणी लेखनिक नव्हता. जवळ होता फक्त वासुदेव नावाचा एक स्वयंपाकी. ' मी सांगतो ते तू लिहून घेशील का रे ?' असे त्यांनी वासुदेवाला विचारले. तो तर त्यांचा भक्तच बनला होता. तो म्हणाला, ' तुम्ही सांगा. मला येईल तसं लिहून घेईन. लिहिता लिहिता माझी सुधारणा होईल !

पण टिळकांनी तो विचार बदलला. मानवतेच्या उदात्त भूमिकेवरून बदलला. वासुदेव हा सक्तमजुरीचा कैदी होता. टिळकांचा आचारी म्हणून नेमणूक झाल्यामुळे त्याच्या कपाळांची सक्तमजुरी टळली होती. अशा स्थितीत त्याला आपल्या सक्तमजुरीत राबवून घेणे टिळकांना प्रशस्त वाटले नाही. वासुदेव हिंपुटी झाला; पण टिळकांनी त्याचा आग्रह मानला नाही.

पण अडचण एवढ्यानेच संपली नव्हती. ग्रंथ लिहायचा तर शाई हवी, कागद हवेत आणि लेखणीही हवी. पण टिळकांना टाक वापरायची परवानगी नव्हती जेलर त्यांना एक शिसपेन्सिल देई व तीही टोक करून देई. कारण कैद्याला चाकू वापरायची बंदी होती. पण कोणत्याही अडचणीवर मात करणे, हा तर टिळकांचा जन्मसिद्ध स्वभावच होता.

ते शिसपेन्सिल घेऊन लिहायला बसले. शिसपेन्सिलने फार वेळ लिहिता येत नाही, खवाटा दुखून येतो हा सर्वांचा अनुभव. टिळकांनाही तो अनुभव येत असे. पण त्यांनी लेखन सोडले नाही. दिवसभरात तीन चार तास तरी लिहायचे. उरलेल्या वेळात पुढच्या लेखनाचे चिंतन करायचे. जाडेजुडे ग्रंथ हाताळायचे, आधार शोधायचे, ते नमूद करायचे. अशा प्रकाराने सतत सहा महिने त्यांनी ग्रंथलेखन केले. अधूनमधून त्यांना ताप येतच असे. ताप आला की लेखन थांबायचे. ताप उतरला की पुनः सुरू

व्हायचे. ही जिद्द प्राणांतिक होती. पण टिळकांनी हाती घेतले ते तडीस नेले. ग्रंथ पुरता हातावेगळा केला. ग्रंथसमाप्तीच्या दिवशी रहस्यकार या स्वरूपात मंडालेच्या तुरुंगाला टिळकांचे एक आगळे दर्शन घडले. टिळकांना जणू हिमालयाची उंची आणि सागराची खोली त्या दिवशी लाभली. तोच उन्हाळा, तेच गरम वारे, तेच धुळीचे लोट, तोच मधुमेह. पण टिळक या सर्व अंतर्बाह्य आपत्तींना धिक्कारून ग्रंथकार या नात्याने अजरामर ठरले.

या गीतारहस्याचा संदेश काय तो टिळकांनीच ग्रंथाच्या शेवटच्या परिच्छेदात सांगितला आहे. कोणीही हृदयावर कोरून ठेवावा असा तो संदेश आहे—

" उपनिषदांतील केवळ बुद्धिगम्य ब्रह्मज्ञानास प्रेमगम्य व्यक्त उपासनेच्या राजगुह्याची जोड देऊन, कर्मकांडाच्या प्राचीन परंपरेप्रमाणे " तुम्ही आपाआपल्या योग्यतेनुरूप आपआपली सांसारिक कर्तव्ये लोकसंग्रहार्थ निष्काम बुद्धीने, आत्मौपम्य दृष्टीने व उत्साहाने यावज्जीव करीत राहून तद्द्वारा पिंडब्रह्मांडात सर्वांभूती एकत्वाने भरलेल्या नित्य परमात्मदेवतेचे नेहमी यजन करा. त्यातच तुमचे पारलौकिक व ऐहिक कल्याण आहे " असे अर्जुनास निमित्त करून सर्वांसच गीताधर्म कंठरवाने सांगत आहे; व त्यामुळे कर्म, बुद्धी ( ज्ञान ) आणि प्रेम ( भक्ती ) या तिहींमधील विरोध नाहीसा होऊन सर्व आयुष्यच यज्ञमय करण्यास सांगणाऱ्या एका गीताधर्मात सकल वैदिक धर्माचे सार आले आहे. हा नित्य धर्म ओळखून केवळ कर्तव्य म्हणून सर्वभूतहितार्थ शेकडो खटाटोप करणारे महात्मे व कर्ते पुरुष जेव्हा या भरतभूमीस अलंकृत करीत होते तेव्हा हा देश परमेश्वराच्या कृपेस पात्र होऊन ज्ञानाच्याच नव्हे तर ऐश्वर्याच्याही शिखरास पोचला होता; आणि हा उभयत्र श्रेयस्कर पूर्वतर धर्म सुटला तेव्हा त्याला निकृष्ट स्थिति प्राप्त झाली हे कोणासही सांगावयास नको."



## बापूजी निघाले दिल्लीला

१९२५ सालची गोष्ट. म. गांधी हरिद्वारहून दिल्लीला निघाले होते. दिल्लीच्या व्हाइसरॉयबरोबर त्यांची मुलाखत ठरली होती. ते आगगाडीने जाणार होते; पण तिसऱ्या वर्गाने. अलिकडे त्यांनी हा नवा नियम केला होता. भारतातला गरीब समाज ज्या वर्गाने प्रवास करतो, तोच वर्ग त्यांनी आपल्यासाठी ठरवला होता. त्यांच्या पत्नी बाही त्यांच्या बरोबर होत्या.

हरिद्वारला गाडी आली; पण तिच्यात बेसुमार गर्दी. रावजीभाई त्यांच्या बरोबर होते. त्यांच्या मदतीने बापूजी कसेबसे गाडीत चढले. त्यांनी कोणाला हट की फट म्हटले नाही. गर्दीतलेच एक बनून कोणाला ओळख न देता ते गाडीतून प्रवास करू लागले.

पुढे लक्सर जंक्शन आले. तिथे उतरून पुढे त्यांना मेल पकडायची होती. गाडीला थोडा वेळ होता म्हणून ते सगळे सामान एकत्र करून फलाटावरच बसले. बापूजी जरा आडवे झाले. गाडी यायला पंधरा वीस मिनिटे होती, तोवर बापूंची एक झोप सहज होऊन जाणार होती.

एवढ्यात दोन पोलिस अधिकारी तिथे आले. त्यांतला एक होता गोरा अन् दुसरा होता हिंदी. बापूजी अन् त्याची माणसे फलाटावर बसली आहेत हे त्या गोऱ्याने पाहिले. गरीब दुबळी असतील कोणी तरी असे त्याला वाटले. त्याचा अधिकारी जागा झाला. तो गरजला,

" सामान उचला अन् बाहेर चला. गाडी आल्यावर फलाटावर या ! "

असे फर्मावून तो अन् त्याचा साथीदार दोघेही पुढे निघून गेले. रावजीभाईंनी त्या हुकमाकडे लक्ष दिले नाही. येणारी गाडी मेल होती आणि ती स्टेशनवर फक्त दोन मिनिटे थांबणार होती. बाहेर जाणे अन् परत आत येणे या ' आव जाव 'मध्ये गाडी चुकण्याचा दाट संभव होता. म्हणून रावजीभाई मान चेपून तसेच बसून राहिले.

ते दोघे अधिकारी फलाटाच्या टोकापर्यंत जाऊन पुन्हा माघारी आले. पाहातात तर हे प्रवासी अजून जाग्यावरचे हालले नाहीत. त्या गोऱ्या सार्जंटाची शीर तडकली.

" ए कूली, इधर आव. उचल या लोकांचं सामान. तिसऱ्या वर्गाच्या मुसाफिरखान्यात फेकून दे. "

रावजीभाई त्या गोऱ्याला परोपरीनी समजावू लागले.

" आता मेल येईल अन् सामान नेण्या-आणण्यात ती आम्हाला चुकेल. तू इतकं ताणून धरू नको."

पण तो रगेल गोरा काही केल्या ऐकेना. एवढ्यात बापूजींना जाग आली. त्यांनी विचारले. ' प्रकार काय आहे ?'

रावजीभाई म्हणाले ' हा गोरा सार्जंट आपल्याला बाहेर जायला सांगतो.'

' का ? ' ' गाडी यावच्या आत कोणी फलाटावर यायचं नाही,' असा कायदा आहे म्हणे ! '

' मग आपल्याला उठायला पाहिजे. '

बापूजी उठले. सामान गोळा करू लागले. एवढ्यान त्यांच्याच डब्यातून त्या स्टेशनवर उतरलेले एक सद्गृहस्थ धावत पळत स्टेशनमास्तरकडे गेले अन् म्हणाले.

" तुम्ही हे चालवलं आहे काय ? ज्यांना तुम्ही फलाटावरून हाकलता, ते गृहस्थ महात्मा गांधी आहेत आणि उद्या त्यांना दिल्लीला व्हाइसरॉयने मुलाखतीला बोलावलं आहे. ही मुलाखत चुकली तर सरकार तुम्हांला धरील. हे लक्षात येत नाही का तुमच्या ?"

स्टेशनमास्तर गडबडला. धावत पळत बापूजींकडे आला.

" बापूजी, आत्ता गाडी येईल. तुम्ही बाहेर जाऊ नका. गाडी चुकेल तुमची."

" छे! छे! कायद्याचं पालन करायलाच हवं. तुमच्या त्या सार्जंटांनी तसं सांगितलं आहे."

बापूजी उठलेच. आणि फाटकाकडे चालू लागले. स्टेशनमास्तर घाबरला. त्याने सार्जंटांना सांगितले, ' चला पुढे. महात्माजींची क्षमा मागा.'

" कोण महात्माजी ?" गोऱ्या सार्जंटने विचारले.

" महात्मा गांधी. व्हाइसरॉयसाहेबांनी उद्या त्यांना दिल्लीला मुलाखतीला बोलावलं आहे. ही मुलाखत चुकली तर सरकार तुला जबाबदार धरील." स्टेशनमास्तरने त्याला कडक शब्दांत सांगितले.

गोरा सार्जंट मनातून हादरला. हे प्रकरण बरेच जड आहे, हे त्याला समजले. त्याने हिंदी सार्जंटला बापूजींकडे क्षमा मागायला पाठवले. त्याने बापूजींना फाटकाकडे पोचायच्या आतच अडवले. तो गयावया करू लागला. बापूजींची क्षमा मागू लागला. बापूजी म्हणाले,

" तू कशाला क्षमा मागतोस ? ज्याने हुकूम दिला, त्याला पाठव."

नाक मुठीत धरून त्या गोऱ्या सार्जंटाला बापूंच्यापुढे यावे लागले. तो बापूजींना म्हणाला,

" माझी चूक झाली. मला क्षमा करा. कृपा करून बाहेर जाऊ नका. आपल्यासारखे सद्गृहस्थ तिसऱ्या वर्गाने प्रवास करतील अशी मला कल्पना नव्हती."

त्यावर बापूजी थांबले अन् थोड्या कठोर शब्दांत त्या गोऱ्याला बोलले,

" माझ्याबद्दल प्रश्न नाही. मी तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचा प्रतिनिधी आहे आहे असं समज. तिसऱ्या वर्गाचा उतारू सामान्यपणे गरीब असतो. पहिल्या अन् दुसऱ्या वर्गाचे उतारू आपलं संरक्षण करण्यास समर्थ असतात. तुमच्या मदतीची गरज असते, ती तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांना. पण तुम्ही त्यांना मदत करण्याऐवजी त्यांना त्रास मात्र देता. तुम्हीच जर उतारूंना असे हैराण करू लागलात तर त्यांनी कोणाच्या तोंडाकडे पाहायचं ?..........."

" मिस्टर गांधी , मी खरंच चुकलो. मला क्षमा करा."

" मला तुमची कोरडी क्षमायाचना नको आहे. यापुढे आपल्या हातून उतारूंशी असं कठोर वर्तन घडणार नाही, अशी मला तुमच्याकडून हमी हवी आहे ! "

त्या गोऱ्या सार्जंटाने बापूजींना तशी हमी दिली. बापूजी गाडीत बसून दिल्लीकडे रवाना झाले.

गांधीजींच्या वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनात असे शेकडो हजारो प्रसग घडून गेले आहेत. त्यांचे सगळे आयुष्य प्रसंगांनीच भरलेले. त्यांतला हा एक लहानसा वैयक्तिक प्रसंग. पण अशा प्रत्येक प्रसंगात त्यांनी आपली ध्येयदृष्टी दाखवली. प्रत्येक प्रसंगात त्यांना या देशातल्या दरिद्रनारायणाचे स्मरण राहिले. वैयक्तिक अनुभवही त्यांनी सार्वजनिक करून टाकले. त्या त्या वेळी भेटलेल्या लोकांच्या मनावर त्यांनी तो तो प्रसंग कोरून ठेवला. समर्थांनी म्हटले आहे—

आधी हरिकथानिरूपण । दुसरे ते राजकारण
तिसरे ते सावधपण । सर्वविषयी ॥

बापूजी सर्व विषयांत आणि सर्व प्रसंगांत सावध राहिले. ‘जनीं जनार्दन’ पाहायचा असेल, तर तो बापूजींच्या डोळ्यांनी पाहावा.

म. गांधींचे चरित्र वाचल्यावर त्यांना राजकारणी म्हणावे का एक महान संत म्हणावे हेच कळत नाही. एखाद्या विशुद्ध परमार्थसाधकाचे सारे गुण गांधीजींच्या ठिकाणी वसत होते. अन्यायाचा प्रतिकार करणे, प्राणपणाने अन्यायाविरुद्ध झगडणे याला आपण राजकारण म्हटले, तर गांधीजी हे जगातले अग्रगण्य राजकारणी ठरतील. सत्य आणि अहिंसा ही तत्त्वे काही गांधीजींनी शोधून काढली नाहीत. ती अनादी, सनातन आहेत. पण ती नव्या अर्थाने भारतातील कोट्यवधी लोकांच्या राजकारणात आणण्याचे श्रेय गांधींनाच आहे. यम-नियमादी योगसाधने आणि प्रार्थना, उपवास वगैरे धर्माचार हेही जगातल्या सर्व धर्मांत प्राचीन काळापासून उपदेशिलेले आहेत; पण व्यावहारिक प्रश्न सोडविण्यासाठी सामुदायिक प्रमाणावर त्यांचा आचार करणे व करविणे या गोष्टी गांधींनी जन्मभर केल्या.

राजकारण अध्यात्ममय करावे, असे नामदार गोखले म्हणत. लबाडी-शिवाय व्यापार नाही आणि कपटाशिवाय राजकारण नाही, अशी आजवरची जगाची समजूत होती. पण गांधीजींनी आपल्या आयुष्यात राजकीय लढे केले, ते ते सर्व अध्यात्म आणि धर्मबुद्धी यांच्या आधारेच केले. त्यात त्यांनी हिंसा, द्वेष, कपट, गुप्तता इ. दोषांना स्थान दिले नाही. १९३० साली त्यांनी कायदेभंगाचे जे नवेच शांतियुद्ध पुकारले, त्यापूर्वी त्यांनी व्हाइसरॉयला एक निर्वाणीचा खलिता पाठविला होता. त्यात आपल्या चळवळीचे अधिष्ठान स्पष्ट करताना त्यांनी म्हटले होते, की ‘हे धर्मयुद्ध आहे आणि ते ईश्वराचे नाव घेऊनच मी चालविणार आहे. त्यात गुप्तता नाही, लबाडी नाही, असत्य नाही.’

✤ ✤



## वीरगर्जना-वीरमरण !

पारतंत्र्याच्या प्रदीर्घ काळात इंग्रज सरकारविरुद्ध प्राणपणाने जे पुढारी झगडले, त्यांपैकी एक म्हणजे लाला लजपतराय. लालाजींची छाती सिंहाची होती. त्यांचे भाषण म्हणजे दुसरी सिंहगर्जनाच. म्हणूनच लोक त्यांना पंजाबकेसरी म्हणत. लाल-पाल-बाल ही त्या वेळची अग्रगण्य त्रिमूर्ती. लाल म्हणजे लाला लजपतराय, पाल म्हणजे बंगालचे बिपिनचंद्र पाल आणि बाल म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक !

ब्रह्मदेशात मंडाले येथे काळ्यापाण्याची शिक्षा भोगणारे पहिले भारतीय वीराग्रणी लोकमान्य टिळक आणि दुसरे तिथेच हद्दपारी भोगणारे वीरपुंगव म्हणजे लाला लजपतराय. लोकमान्यांनी मंडालेच्या कारावासात ‘ गीता-रहस्य ’ हा एक महाग्रंथ लिहिला तर लालाजींनीही तिथे असताना गीतेवरच एक प्रबंध रचला. राजद्रोहाचा आरोप ठेवून लोकमान्यांना सहा वर्षांची शिक्षा झाली होती. पण आपल्याला हद्दपार का केले, हे लालाजींना मात्र ठाऊक नव्हते. ‘ माझ्यावरचे आरोप तरी काय ते मला कळवा ’ म्हणून

लालाजींनी सरकारला परोपरींनी लिहिले; पण त्यांना बोटभर चिठ्ठीचे उत्तरच मिळाले नाही. याचा अर्थ ' हम करे सो कायदा ' हाच होता.

पण लालाजींना ही हद्दपारी का झाली, ते मी तुम्हांला सांगणार आहे–

१९०७ च्या सुमाराची गोष्ट. त्या वेळी देशात स्वदेशी आणि बहिष्कार ही चळवळ फोफावली होती. त्या मार्गाने इंग्रजांच्या नाड्या आखडण्याचा भारतीय पुढाऱ्यांचा मनोदय होता. पंजाबमध्ये लालाजींनी ती चळवळ उचलून धरली होती. त्यांनी लोकांना निर्भय बनवले होते. आणि तेव्हापासूनच ते ब्रिटिशांच्या डोळ्यांत कुसळासारखे सलू लागले होते.

तशातच वाराणसी येथे ना. गोखले यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सभेचे अधिवेशन भरले. गोखले मवाळ पक्षाचे तर लालाजी जहाल. लालाजींचे त्या अधिवेशनातले भाषणही त्यांच्या स्वभावाला अनुसरूनच झाले. ते ऐकून लोकांचे बाहू फुरफुरू लागले. पंजाबभर त्या भाषणाने मोठी खळबळ उडवून दिली. अनेक अग्रगण्य वकील, बॅरिस्टर लालाजींच्या चळवळीत सामील झाले. जहाल भाषणे करू लागले. लोकांना स्फुरण देऊ लागले.

त्यासरशी सरकार खडबडून जागे झाले. त्याने धरपकड सुरू केली. मोठमोठ्या मान्यवर व्यक्तींना गजाआड केले. हे बहुतेक लालाजींचे समान व्यवसायी आणि मित्र होते. पण तेवढ्याने सरकारचे समाधान झाले नव्हते. या प्रकरणी चीफ कोर्टाचे रजिस्ट्रार एकदा बॅ. बोधराज यांना म्हणाले,

" आम्ही अनेकांना कोठडीत डांबलं हे खरं. पण या चळवळीची सूत्रधार व्यक्ती अजून बाहेरच आहे. त्या व्यक्तीला कसं पकडायचं या विवंचनेत आम्ही आहो. पण आम्हांला उमेद आहे. लौकरच ती व्यक्ती आमच्या तडाख्यात सापडेल. "

हे नाव न घेता बोलणे लालाजींना उद्देशून होते. बॅ. बोधराज यांना ते कळले. त्यांच्या मार्फत लालाजींच्या इष्टमित्रांनाही कळले. ते लालाजींना

प्रेमाच्या सूचना देऊ लागले. तुम्ही सरकाच्या कचाट्यात सापडू नका. शक्य तर कुठे तरी तोंड लपवा.' पण लालाजींनी कोणाचेही ऐकले नाही. ते स्वतःच्या मरणाला भीत नव्हते. त्यांना चिंता लागली होती रावळपिंडी येथे कोठडीबंद झालेल्या आपल्या वकील मित्राची. ते विचार करू लागले की, लाहोरहून उठून सरळ रावळपिंडीला जावे. त्या मित्राच्या सुटकेची काही खटपट करावी.

लालाजींचा हा विचार त्या कोठडीबंद मित्राच्या कानापर्यंत पोचला. त्याने लालाजींना उलट निरोप पाठवला. 'कृपा करून तुम्ही इकडे येऊ नका. तुमचा आमचा संबंध आहे, हे जर सरकारला कळले तर आम्हांला अधिकच त्रास होईल.'

लालाजी पकडले जाणार ही वार्ता पंजाबभर पसरायला वेळ लागला नाही. लालाजींनाही त्याबद्दल चिंता वाटू लागली. लालाजी पकडले गेल्याने त्या कुटुंबावर मोठाच आघात होणार होता. विशेषतः त्यांचे वडील खचणार होते. त्यांना लालाजींची चळवळ मुळीच आवडत नव्हती. मुलाने मन लावून वकिली करावी, खूप पैसा मिळवावा, मानाने जगावे असे त्यांना वाटत होते. आणि आता लालाजी पकडले गेले, तर सर्व आशा-आकांक्षाचा चुराडा होणार होता. विरोध असला तरी ते वडील होते आणि वडिलांना दुःख देणे हेही लालाजींच्या जिव्हारी लागणार होते. ते एका ठिकाणी लिहितात—

"वडिलांची आज्ञा पाळावी की मातृभूमीविषयीचे आपले कर्तव्य पार पाडावे, या एकाच समस्येने माझे सारे आयुष्य व्यापून टाकले आहे. वडिलांना मान्य नसलेल्या, किंबहुना त्यांची यत्किंचितही सहनुभूती नसलेल्या अनेक गोष्टी करून मी त्यांना कैक वेळा नाराज केले आहे. परंतु त्यामुळे आमचे संबंध तुटावे अशी पाळी मात्र कधीच आली नाही. माझ्या कार्यामुळे आम्हा दोघांत मतभेद उत्पन्न झाला. तरी मला एक धीर

होता, की कोठल्याही परिस्थितीत वडील माझ्या रक्षणासाठी माझ्या मागे उभे राहतील....”

हे सगळे खरे असले तरी येऊ घातलेला प्रसंग वडिलांना कळवणे हे लालाजींचे कर्तव्य होते आणि त्यांनी ते एका पत्राने पार पाडले. पित्याविषयी अतीव आदर असलेल्या एका सुपुत्राचे ते पत्र असे होते—

“ पूजनीय पिताजी !

रजपतरायांच्या पत्त्यावर आपण पाठविलेली तार मिळाली. मी लवकरच पकडला जाणार अशा अफवा इकडे उठल्या आहेत. त्या खऱ्या की खोट्या हे सांगणे कठिण आहे. ते काहीही असले तरी मला आपल्याला एक सादर नम्र विनंती करावीशी वाटते. ती इतकीच की माझ्यावर कसलीही आपत्ती कोसळली तरी आपण घाबरून जाऊ नये. विस्तवाशी खेळ करणारा इसम एक ना एक दिवस त्याच विस्तवाच्या ज्वालांत गुरफटण्याचा संभव असतोच. त्यानेही त्या गोष्टीला तयार असणे जरूर आहे. राज्यकर्त्यांच्या कारभारावर टीका करणे हेही आगीशी खेळण्यासारखेच आहे. मला कोणत्या एका गोष्टीविषयी वाईट वाटत असेल, तर ती गोष्ट म्हणजे मी पकडला गेल्यास आपणास होणारे दुःख ही होय. माझी एवढीच मनापासून इच्छा आहे, की मजवर येणाऱ्या संकटाने आपण खचून जाणार नाही, असे आपण एकवार मला सांगावे. लाला हंसराज, गुरुदास राम, अमोलकराम यांच्यासारखे मोहरे तुरुंगात खितपत पडले असता माझ्या अटकेची काय कथा ! कोणत्याही कारणास्तव भीरुता प्रदर्शित करण्याची ही वेळ नाही. उलट या वेळी येणाऱ्या कोणत्याही संकटाला धैर्याने तोंड देणे हेच योग्य होईल !

आपला आज्ञाधारक
लजपतराय

आणि त्यानंतर थोड्याच दिवसांत सरकारने लालाजींना पकडले. बाहेर कोणीतरी आले आहेत असे कळल्यावरून ते दार उघडून बाहेर आले तर समोर मोठमोठे पोलिस अधिकारी उभे. त्यांनी म्हटले.

" पोलिस कमिशनर ठाण्यात बसले आहेत. त्यांनी तुम्हांला भेटायला ठाण्यात बोलावले आहे. "

लालाजींना पुढील घटनांचा अंदाज लागला. ते शांतपणे म्हणाले,

" कोर्टांत थोडं काम आहे तेवढं करतो अन् भेटीला येतो. "

" तसं नको. आधी चला. तिथून मग कोर्टात जा."

" ठीक आहे " असे म्हणून ते त्या अधिकाऱ्यांबरोबर पोलिसठाण्याकडे निघाले. त्यांना पाहताच कमिशनर म्हणाले,

" हिंदुस्थान सरकारच्या वॉरंटानुसार मी तुम्हांला गिरफदार करीत आहे. सरकारने तुम्हांला हद्दपार करायच ठरविलं आहे. "

त्यावर लालाजी एकच वाक्य बोलले, ' जशी आपली इच्छा ! ' आणि ते पोलिसांच्या स्वाधीन झाले.

लगेच पुढची कारवाई सुरू झाली. सरकारने लालाजींना मोठ्या बंदोबस्तात गाडीत बसवले. तिथून बोटीवर आणले. बोट चालू झाली. ब्रह्मदेशात पोचली. तिथे त्यांना उतरून मंडाले येथे आणण्यात आले. मंडालेच्या किल्ल्यात बंदिस्त करण्यात आले. आपण कुठे आलो हे त्यांना कळले. पुढच्या परिस्थितीला तोंड देण्याची त्यांनी तयारी केली. प्रथम त्यांनी आपल्या मुलाला एक पत्र पाठविले.

" प्रिय पुत्र !

प्राप्त स्थितीत शक्य तो आनंदात राहण्याचा मी प्रयत्न करीत आहे. एका गोष्टीबद्दल मला पूर्ण विश्वास आहे. ती ही, की मी माझ्या उद्दिष्ट कार्यापासून ढळणे शक्य नाही. माझ्या अंतःकरणात

कोणत्याही प्रकारे निराशा किंवा दीनता यांचा शिरकाव होणे शक्य नाही. कोणत्याही अवस्थेत राहण्याची माझी तयारी आहे. तू आपल्या आजोबांची अन् आईची सेवा कर. आपल्या प्रकृतीची काळजी घे. चुलत्याशी प्रेमाने वाग आणि आल्या आपत्तींना धैर्याने तोंड दे...."

तुझा मंगलाभिलाषी
लजतपराय

लालाजींना त्या हद्दपारीत अनेक अडचणी सोसाव्या लागल्या. पण तरीही ते आनंदित राहिले. त्यांनी कोठल्याही प्रकारची कुरकुर केली नाही. सहा महिन्यांनी त्यांची मंडालेहून सुटका झाली. सरकारने त्यांना पंजाबात त्यांच्या घरी आणून सोडले. पुन्हा त्यांनी चळवळींची सूत्रे हाती घेतली. ते एकेक लढा लढत राहिले. मग काही दिवसांकारिता विलायतेला गेले. तिथे त्यांच्यावर दुसरा हद्दपारीचा हुकूम बजावण्यात आला. मग ते विलायतेहून अमेरिकेला गेले. तिथे पाच वर्षे राहिले. त्या अवधीत त्यांनी तिथे हिंदी स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. ब्रिटिशांच्या सार्वत्रिक दडपशाहीची अमेरिकन जनतेला माहिती दिली. काही ग्रंथही लिहिले. तिथून मग ते मायदेशी आले. स्वातंत्र्यसंग्रामात आघाडीचे झुंजार झाले. आणि १९२८ साली लढता लढता धारातीर्थी पडले. गोष्ट घडली ती अशी—

काही वर्षांपूर्वी ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानसाठी काही सुधारणा जाहीर केल्या होत्या. त्यांना मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा असे नाव होते. त्या सुधारणा हिंदुस्थानात कितपत रुजल्या अन् सफल झाल्या, याची पाहणी करण्यासाठी इंग्लंडच्या बादशहाने एक सात लोकांचे कमिशन नेमले. श्री. सायमनसाहेब यांना त्या कमिशनचे अध्यक्ष केले. या कमिशनवर ब्रिटिश सरकारने एक-दोन तरी हिंदी प्रतिनिधी घ्यायला हवे होते.

पण सरकारने ते घेतले नाहीत. त्या गोष्टीचा भारतीय पुढाऱ्यांना राग आला. अपमानही वाटला. सायमन कमिशन हिंदुस्थानकडे यायला निघाले. भारतीय पुढाऱ्यांनी त्या कमिशनवर बहिष्कार घालावयाचे ठरविले. बोटीतून उतरल्यापासूनच कमिशनला ‘ सायमन गो बॅक ’ या आरोळ्या कानठळ्या बसेपर्यंत ऐकाव्या लागल्या. हिंदुस्थानात जणू आगडोंब उसळला.

सायमन कमिशन ३० ऑक्टोबर १९२८ ला लाहोरला आले. त्याच्या निषेधासाठी तिथे प्रचंड मिरवणूक निघाली. लाहोर स्टेशनवर आली. तिच्या अग्रभागी लालाजीच होते. मिरवणूक शांतपणे चालली होती. पण पोलिसांचे पित्त खवळले. त्यांना लाहोरच्या जनतेला चोपून काढायचे होते. सायमन साहेबांना आपला पराक्रम दाखवून खूश करायचे होते. वस्तुतः शांतपणे मार्ग चालणाऱ्या मिरवणुकीवर हल्ला करण्याचे पोलिसांना कारण नव्हते. पण त्यांचा तोल गेला होता. विवेक सुटला होता. लालाजीं-विषयी त्यांचे माथे भडकले होते.

एवढ्यात एकाएकी मिरवणुकीवर पोलिसांचा लाठीहल्ला सुरू झाला. त्यांचा रोख लालाजींवरच होता. लालाजींवर पडणाऱ्या लाठ्या अन्य लोकांनी आपल्या उरा-पाठीवर झेलल्या. पण तरीही डी. एस. पी. सँडर्स याने लालाजींच्या छातीवर दोन दणकट दंडुक्याचे प्रहार हाणलेच. ते लालाजींच्या जिव्हारी बसले. छातीतून कळ आली. पण ते एक पाऊलही मागे हटले नाहीत. उलट संतापाने बेभान होऊन गरजले.

“ पोलिसांनो, तुमचे हे घाव माझ्या छातीवर पडले नाहीत, तर ब्रिटिश साम्राज्याच्या छाताडावरच पडले आहेत असं समजा. तुम्ही तुमच्या साम्राज्याचं थडगं खणत आहा ! ”

मिरवणूक संपल्यावर सरकारच्या निषेधाची प्रचंड सभा झाली. त्या सभेत हा पंजाबकेसरी गरजला :

"शांततेच्या मार्गाने स्वराज्य मिळवणं हे आमचं ध्येय आहे. पण सरकार जर अशाच रानटीपणाने वागणार असेल तर आमची तरुण पिढी आमच्या हातातून सुटेल. मग जर देश स्वतंत्र करण्यासाठी त्यांनी एखादा वेडावाकडा मार्ग स्वीकारला, तर त्याची जबाबदारी सरकारवर पडेल. तसं काही घडेपर्यंत मी जिवंत असेन की नाही कोण जाणे! पण सरकारच्या चिथावणीमुळे तसं काही झालंच तर माझा आत्मा त्या तरुणांना आशीर्वादच देईल!"

सभा आटोपून लालाजी घरी गेले. त्या वर्मी बसलेल्या लाठीमाराने त्यांची छाती दुखू लागली. त्यांच्या शरिराला अत्यंत थकवा आला. औषधोपचार तातडीने सुरू झाले. पण एकही औषध पारले नाही. वेदना वाढतच चालल्या. १६ नोव्हेंबरची रात्र सर्वांनी जागून काढली. १७ नोव्हेंबरला वेदनांचा कळस झाला. काणि त्यात कुठली तरी एक कळ प्राणघातक ठरली. लालाजींचा देह निष्प्राण झाला. सर्व देश शोकसागरात बुडाला.

लालाजींना वीरमरण लाभले!!



३९
किशोर ७८

## वंगभंगाचा काव्यमय उद्रेक

लॉर्ड कर्झन हा हिंदुस्थानचा व्हाइसरॉय असतानाची गोष्ट. एके दिवशी त्याला वाटले की, बंगाल हा अवाढव्य प्रांत आहे. आणि त्यामुळे तो राज्यकारभाराला डोईजड आहे. मग काय करायचे? त्याचे दोन तुकडे पाडायचे. त्याचे काही जिल्हे आसामला जोडायचे. आसाम अन् पूर्वबंगाल असा एक स्वतंत्र प्रांतच बनवून तो लेफ्टनंट गव्हर्नरच्या ताब्यात द्यायचा.

लॉर्ड कर्झनची ही लहर साधी नव्हती. तिच्यात एक कुटिल डाव होता. बंगालमधले हिंदु-मुसलमान एकजीवपणे वागत होते. त्यांनी आपसातला दुजाभाव सोडून दिला होता. या दोन जमातींची ही एकी कर्झनच्या काळजात खुपत होती. बंगालची फाळणी केल्याने पूर्वबंगालमधील बहुसंख्य मुसलमान हिंदूंपासून तुटणार होते. दोन्ही जमाती वेगवेगळ्या पद्धतींनी विचार करू लागणार होत्या. दोन्ही जमातींचे हितसंबंध वेगवेगळे होणार होते. लॉर्ड कर्झनला हेच व्हायला हवे होते. कारण ‘ फोडा अन् झोडा ’ हे ब्रिटिश राजनीतीचे सूत्रच होते.

लॉर्ड कर्झनच्या या घोषणेने साऱ्या बंगालवर जणू आकाशीची कुऱ्हाडच कोसळली. बंगालच्या तोंडचे पाणी पळाले. सगळे चिंताक्रांत झाले. काहीतरी करायला हवे. निषेध नोंदवायला हवा. विरोध संघटित करायला हवा. मग काय करायचे? सभा, संमेलने, अर्ज, विनंत्या हे सगळे झाले. पण कर्झनने त्या सर्वांना वाटाण्याच्या अक्षता लावल्या. म्हणाला, " काही उपयोग नाही तुमच्या अर्जाविर्जाचा. बंगालची फाळणी अटळ आहे!"

लोक म्हणाले " अटळ कशी ती पाहू या." या फाळणीविरुद्ध सारा बंगाल एक झाला. जहाल, मवाळ, राजे, महाराजे, जमीनदार, व्यापारी सगळेच एकत्र आले. रवींद्रनाथ ठाकूर हे एक बडे जमीनदार सरकारला खूप ठेवून जमिनदारांनी आपल्या संस्थानात राज्य चालवायचे. पण रविबाबूंना सरकारी कृपा झुगारून फाळणीविरोधी जनसंमर्दात उभे राहावेसे वाटले. ते नुसते दाखल झाले नाहीत तर आघाडीवर आले. तरुण रक्त आणि कविमन! त्यांचा आत्मा चेतून उठला.

सभा झाल्या. निषेध झाले. आवेशपूर्ण भाषणे झाली. यापुढे स्वदेशी माल वापरायला लागायचे; ब्रिटिश मालावर, बहिष्कार घालायचा, असे ठरावही झाले. लोक उग्र बनले. छातीवर वार झेलायला तयार झाले. बंगालची फाळणी होऊ द्यायची नाही, मुसलमानांना हिंदूंपासून वेगळे करू द्यायचे नाही, अशा घोषणा लक्ष लक्ष कंठांतून होऊ लागल्या.

पण लॉर्ड कर्झन दबला नाही, नमला नाही. त्याने बंगालच्या या संघटित विरोधाला किंमतच दिली नाही. १६ ऑक्टोबर १९०५ ही त्याने फाळणीची तिथी निश्चित केली. पण बंगाली लोकांनीही सरकारला आपले विराट विश्वरूप दाखवायचे ठरवले. कार्यक्रम ठरला तो असा—

सर्वांनी त्या दिवशी उपोषण करायचे. गंगेवर जाऊन सामुदायिक स्नान करायचे. 'भाई भाई एक ठाई भेद नायी भेद नायी' असे म्हणून एकमेकांच्या हातात पवित्र राखी बांधायची. तिथून मिरवणुकीने निघायचे.

असा सगळा कार्यक्रम ठरला. गंगास्नान करून मिरवणूक निघाली. अग्रभागी रवींद्रनाथ ठाकूर. तरुण रक्ताचा देशभक्त कवी. रविबाबूंनी त्या मिरवणुकीसाठी, एक खास कविता रचली होती. ते स्वतः तिचा एकेक चरण सांगत होते. सहस्र कंठांतून तिचा पुनरुच्चार होत होता. कविता नव्हे; तो साक्षात् आत्मविश्वास होता—

**विधिर बाँधन कटबे तुमि एमन शक्तिमान**
**तुमि कि एमन शक्तिमान ।**
**आमादेर भांगगडा तोमादेर हाते एमनि अभिमान**
**तोमादेर एमनि अभिमान ।**
**चिरदिन टानबे पिछे**
**चिरदिन राखबे निचे**
**एतबल नाइ रे तोमार**
**रबे ना सेइ टान ॥**
**शासने जतइ घेरो**
**आछे बल दुर्बलेरो**
**होउ ना जतइ बडो**
**आछेन भगवान ॥**
**आमादेर शक्तिमेरे**
**तोरा ओ बाँचबि जे रे**
**बोझा तोर भारि होलेइ**
**डुबबे तरीखान ॥**

(हे इंग्रज शासकांनो!) आमचे प्रेमबंध विधिनिर्मित आहेत. ते तुम्ही तोडून टाकायला निघाला आहां. एवढे का तुम्ही शक्तिमान आहां? आम्हांला खाली पाडणे किंवा उभे धरणे, जोडणे किंवा मोडणे हे

सर्वस्वी आपल्या हातात आहे असा तुमचा अहंकार आहे काय? सोडून द्या तो आम्हांला तुम्ही चिरकाल ताणून धरू शकत नाही. आम्हांला ठेचण्याची ताकद नाही तुमच्या अंगात. तुमचे हुकूमशाही कायदे. त्यांचे पाश तुम्ही आमच्या भोवती आवळता आहां. आम्ही आज दुर्बल असू. पण तुमचे पाश तोडून टाकण्याची ताकद आमच्यामध्ये निश्चित आहे. तुम्ही केवढेही समर्थ किंवा बलवान असा. भगवान तुमच्यापेक्षाही समर्थ आहे, बलवान आहे. आमची शक्ती खर्ची केलीत, तरी तुम्ही वाचणार नाही. अरे, बोजा भारी झाला, की तुमची शासननौकाही बुडून जाईल. तिच्यासकट बुडाल! नाही राहणार तुम्ही जाग्यावर!

रवींद्रबाबूंची ही कविता बंगालच्या कोनाकोपऱ्यापर्यंत पसरली. गाव आणि गाव त्या कवितेच्या उद्घोषाने गर्जत उठले.

रविबाबू जागोजाग विद्यार्थ्यांच्या हृदयात स्वातंत्र्याची ज्योत पेटवू लागले. त्यांना कर्तव्याचा मार्ग दाखवू लागले. एका फार मोठ्या विद्यार्थी-मेळाव्यात भाषण करताना ते म्हणाले—

केवळ पुस्तकी विद्येवर अवलंबून राहू नका. परक्यांनी लिहिलेला इतिहास अन् आपल्या समाजाचे केलेले मापन हे खरे मानून स्वदेश व स्वसमाज ह्यासंबंधीच्या आपल्या कल्पना बनवू नका. स्वतः शोध घ्या; निरीक्षण करा; खेड्यापाड्यातून पसरलेल्या बहुसंख्य बांधवांचे जीवन पाहा. त्यांचे विचार, आचार, समजुती, धर्मकल्पना नीट समजावून घ्या.... तुम्ही जर खेड्यातीलच असाल, तर खेड्यातच राहा. तेथील लोकांशी बंधुत्वाच्या नात्याने वागून त्यांना शिक्षण द्या. त्यांच्या हक्कांची त्यांना जाणीव करून द्या. ते दुबळे न राहता सबळ कसे होतील, ते पाहा. अन्यायाचा प्रतिकार कसा करावा, हे त्यांना शिकवा. स्वतः अनेक प्रकारचे ज्ञान संपादन करा व दुसऱ्यांना ज्ञान द्या. ज्ञानाचे देणे-घेणे होत राहण्यात उभयपक्षी विकास होत राहतो.

याच रवींद्रनाथ ठाकुरांच्या गीतांजली या कवितासंग्रहाला १९१३ साली नोबेल पारितोषिक मिळाले. रवींद्रनाथ विश्वकवी ठरले. इंग्रज सरकारने त्यांना 'सर' किताबही बहाल केला. श्री. रवीन्द्रनाथ हे सर रवीन्द्रनाथ झाले. पुढे अमृतसर येथे ब्रिटिश सरकारने जालियनवाला बागेत निर्घृण हत्याकांड करून निरपराध जीवांनाही जिवे मारले. ही घटना ऐकून रवींद्रनाथ अस्वस्थ झाले आणि अंतरी तडफडले. त्याच क्षणी व्हाइसरॉयला पत्र लिहून त्यांनी आपल्या 'सर' या उपाधीचा त्याग केला. रवींद्रनाथ तेवढेच करू शकत होते. ते करून त्यांनी भारतीयत्वाचा स्वाभिमान कायम राखला.



# एक सत्यनिष्ठ समर्पित जीवन

१९३० सालची गोष्ट. ते वर्ष गांधीजींच्या दांडीयात्रेचे. मिठाच्या सत्याग्रहाचे. त्या सत्याग्रहात गांधीजी पकडले गेले अन् भारतभर सत्याग्रहाचे होमकुंड पेटले देशभरातले पुढारी तर गजाआड झालेच; पण सामान्य सत्याग्रहींची धरपकड करून सरकारने तुरुंग भरून काढले.

त्या यज्ञात डॉ. राजेंद्रप्रसाद यांचीही आहुती पडली. सहा महिन्यांची शिक्षा अंगावर घेऊन राजेंद्रबाबू बिहारमधील छपरा गावच्या तुरुंगाच्या महाद्वारात उभे झाले. कशी कोण जाणे ! पण राजेंद्र त्या दिवशी आपल्या जेलमध्ये येणार अशी तिथल्या सर्व प्रकारच्या कैद्यांना कुणकुण लागली होती. ते जेलच्या महाद्वाराच्या आत दुतर्फा गर्दी करून उभे राहिले होते. बाबूजींच्या दर्शनासाठी. त्यांची स्नेहपूर्ण सात्विक दृष्टी आपल्या अंगावर घेण्यासाठी.

बाबूजी गाडीतून महाद्वारात उतरताच आतून घोषणा सुरू झाल्या.

‘ राजेंद्रबाबू की जय ! ’ आता जेलरला प्रश्न पडला. आत एवढी गडबड चाललेली असताना तुरुंगाचे फाटकच उघडायचे कसे ! काही विपरीत घडले तर ! जेलर घाबरला. तो दरवानाला फाटक उघडण्याचा हुकूमच देईना. बाबूजी बाहेर उभे. त्यांचे संरक्षकही उभे. जणू स्थिर चित्र ! आता कैदी अधिकच घोषणा देऊ लागले. कैद्यांचा आवाज चढला. उत्कंठाही शिगेला पोचली.’

तो सगळा गलका अन् गोंधळ ऐकून आणि पाहून राजेंद्रबाबू त्या जेलरला म्हणाले,

“ तुम्ही फाटक उघडा. निःसंशय उघडा. मी आत पाऊल टाकलं की सारं शांत होईल. तुम्ही माझं ऐका.”

आणि मग जेलरने मोठाच धीर करून एकदाचे फाटक खोलले. पोलिसांनी बाबूजींना जेलरच्या स्वाधीन केले. पोलिसांची जबाबदारी संपली. बाबूजी आत गेले. प्रसन्न मनाने त्यांनी त्या सर्व कैद्यांवर चौफेर नजर टाकली. सर्वांची सादर वंदना स्वीकारली. ते सर्वांना म्हणाले, ‘ आपण सत्याग्रही आहो. सर्वांनी शिस्तीत वागायचं. जेलच्या अधिकाऱ्यांना त्रास द्यायचा नाही. तुम्ही आता आपापल्या जागी चला अन् कामाला लागा........”

बाबूजींची ती आश्वासक आज्ञा सर्वांनी ऐकली. शिरसामान्य केली. वातावरण निवळले, शांत झाले.

पण बाहेरच्या वातावरणाचे काय ! बाहेरही हजारो लोक जमले होते. तेही उचंबळून बाबूजींचा जयघोष करीत होते. जेलर त्याही गोष्टीला घाबरला. या बाहेरच्या जमावाला कसे पांगवायचे ! लोक अनावर झाले अन् फाटक मोडून आत शिरले तर मग केवढा अनर्थ ? खरे म्हणजे तो जेलर डरपोकच होता. तुरुंगातल्या कैद्यांवर गुरगुरणे, त्यांना सतावणे, एव-एवढ्यातच त्याचा सगळा पराक्रम दिसायचा. त्यामुळे तो बाहेरच्या

गर्दीला भ्याला. त्याने शिपायांना हुकूम सोडला,

" जेलच्या तटावर चढा अन् हवेत गोळीबार करा ! "

पोलिसांनी लगेच चार वायबार काढले. लोक हसले. हळूहळू पांगले. नाही तरी पांगणारच होते. पण जेलरने आपल्या मिशीला पीळ भरला. बिचारा जेलर ! तो पीळ फार काळ टिकला नाही. त्याला मिशांचे आकडे खाली करावे लागले. कारण तेवढ्या वायबार काढण्याबद्दलसुद्धा जिल्हा-दंडाधिकाऱ्याने त्याच्यावर ठपका ठेवला !

तुरुंगाच्या आवारात कशाचा भेदभाव नव्हताच. चोर, दरोडेखोर, अत्याचारी, खुनी अन् राजबंदी, सगळ्यांना वागणूक सारखी. सब घोडे बारा टक्के हा हिशेब ! राजेंद्रबाबू सुप्रसिद्ध वकील. चारित्र्यवान पुढारी. त्यांचे दरमहाचे हजारो रुपयांचे उत्पन्न ! विलायतेला जाऊनही ते एक दावा जिंकून आलेले. पण जेलरला त्याचे काय होय ! इतरांसारखेच तेही एक गुन्हेगार !

वास्तविक राजेंद्रबाबू अजून कच्च्या कैदेत होते. कच्च्या कैदेत असेतो कैद्याला घरचे अन्न मागवता येते. बाबूजींनाही ते मागवता आले असते. पण एका जाचक नियमाचा निषेध म्हणून त्यांनी ते मागवणे रहित केले. जेलरने एक नियम करून ठेवला होता. कैद्याला घरून येणारे अन्न त्याने फाटकापाशीच खाल्ले पाहिजे. 'ते कोठडीत आणायचे नाही. कारण कैद्याने ते दुसऱ्या कैद्याला दिले तर—ते तसे देण्याचा कायदा नाही.

म्हणून हा राजेंद्रबाबूंचा सत्याग्रह होता. एकदा त्यांच्या घरून आंबे आले. अपूक वस्तु बाबूजींना मिळावी, ही घरच्या मंडळींची इच्छा. पण जेलर म्हणाला, ' फाटकापाशी खा अन् परत या.' बाबूजींनी ते आंबे जसेच्या तसे परत पाठवले.

तीच गोष्ट वृत्तपत्रांची. राजबंद्यांना वृत्तपत्रे वाचायला मिळत; पण जी सरकारधार्जिणी असतील तीच ! स्वतंत्र बाण्याच्या वृत्तपत्रांना जेलच्या

आवारात मज्जाव होता. त्यांचे सहकारी वकील कोणाला तरी चिरीमिरी देऊन हवी ती वृत्तपत्रे कोठडीत आणीत अन् वाचीत. बाबूजी त्या वृत्तपत्रांना शिवतही नसत; मग वाचणे दूरच. ते कायदेशीरपणे मिळतील तीच वृत्तपत्रे वाचीत.

तीच गत घरून येणाऱ्या पत्रांची. जेलचा नियम असा—आलेली पत्रे प्रथम तपासणीदाराकडे जायची. त्याने त्यांतले सूक्तासूक्त नको तिथे खोडायचे अन् अशी जायबंदी केलेली पत्रे मग कैद्यांना मिळायची. या कामात काही दिवस निघून जायचे. पण याही बाबतीत उच्चवर्गीय कैद्यांनी सवलत मिळवली. अर्थात त्या बाबतीत काही तरी हातमिळवणी झालेलीच असणार! पदाधिकारी आलेली पत्रे प्रथम गुपचुप उच्चभ्रू कैद्यांना वाचायला देई अन् त्यांनी वाचल्यावर मग ती सेन्सॉरकडे रवाना करी. बाबूजींविषयीच्या आदराने त्याने तीच गोष्ट त्यांच्या बाबतीतही केली. बाबूजींनी पाहिले, तो सेन्सॉरचा सहीशिक्का नाही. त्यामुळे बाबूजींनी त्या पत्राला मायनाही वाचला नाही. ती पत्रे सरळ त्याच्या स्वाधीन करून बाबूजी म्हणाले,

" पुन्हा असं करू नको. हे बेकायदेशीर आहे ! "

शिक्षा सक्तमजुरीची नव्हती. दैनंदिन कार्यभाग उरकल्यावर सगळा दिवस मोकळा ! मग कोणी गप्पा छाटीत, कोणी वाचीत, तर कोणी पत्ते खेळत. बाबूजींना आला दिवस असा वाया घालवणे म्हणजे पाप वाटे. राजेंद्रबाबू म्हणजे गांधीजींचे पट्टशिष्य. त्यांच्या तत्त्वज्ञानाची मोहिनी पडलेले. त्यांना वाटले, गांधीजींचे विचार समाजाच्या सर्व थरांत पसरावे यासाठी काहीतरी करायला हवे. कल्पना सुचली, की गांधींनी लिहिलेले सर्व लेख वाचावे, त्यांची विषयानुरोधाने वर्गवारी करावी अन् एक पुस्तक तयार करावे. जेलच्या बाहेर गेल्यावर ते छापून प्रसिद्ध करता येईल.

आपली ही कल्पना त्यांनी जेलरकडे बोलून दाखवली. त्याच्याकडे

गांधीसाहित्याची मागणी केली. राजेंद्रबाबूंची सत्यनिष्ठा, त्यांची प्रेमळ वागणूक, जेलचे नियम पाळण्याची तत्परता अन् पाच मिनिटांच्या बोलाचालीतही प्रत्ययाला येणारी त्यांची विद्वत्ता यांनी तो जेलर प्रभावित झाला होता. विशेषतः त्यांच्या सौजन्याने तर तो पार विरघळून गेला होता.

आपल्या हातून या थोर पुरुषाची काही सेवा घडावी असे त्या जेलरला अलिकडे नेहमी वाटायचे. तशात बाबूजींनी हा उपक्रम त्यांना ऐकवला. जेलर म्हणाला, 'तुम्ही यादी द्या, मी पुस्तकं आणून देतो.' बाबूजींनी यादी दिली अन् चार दिवसांच्या आत सगळी पुस्तके बाबूजींच्या पुढे येऊन विराजमान झाली. बाबूजींना मिष्टान्न मिळाल्याचा आनंद झाला. त्यांनी जेलमधले काही पदवीधर तरुण निवडले. त्यांनाही बाबूजींच्या सान्निध्यात राहायची इच्छा होतीच. बाबूजींनी त्यांना कामाचे दिग्दर्शन केले आणि तेही त्या कामात निमग्न झाले.

असे काही दिवस गेले. अर्धे मुर्धे पुस्तक तयार झाले. आणि एके दिवशी जेलर धावत धावत बाबूजींच्या कोठडीत आला.

"बाबूजी! जेलचा सर्वश्रेष्ठ अधिकारी तुरुंगाला भेट द्यायला येतो आहे. तुम्ही तुमच्याकडची सगळी पुस्तकं माझ्या स्वाधीन करा. फक्त एक पुस्तक तुमच्यापाशी ठेवा. अधिकारी गेला म्हणजे मी पुन्हा सगळी पुस्तकं तुम्हांला आणून देईन!"

"असं का? जेलमध्ये पुस्तकं वापरणं गुन्हा आहे?" बाबूजींनी विचारले.

"कैद्याला एका वेळी एकच पुस्तक द्यायचं असतं. अन् तेही सेन्सॉरने वाचल्यानंतर."

"मग तुम्ही असं का केलंत? एवढी पुस्तकं एकदम मला का दिलीत? नियम का मोडलात?"

"नियम का मोडलात?...... बाबूजी, कसं सांगू तुम्हाला? आम्ही

जेलचे अधिकारी असलो, करड्या शिस्तीचे असलो, तरी बाबूजी, आम्ही पण माणसच आहो. आम्हांला विचार आहे, भावनाही आहेत....तुमच्यासारखे शिकलेसवरलेले अन् ऐषआरामात जीवन जगता येईल असा सांपात्तिक दर्जा असलेले लोक ! तुम्ही का ही फकिरी पत्करली ? का असे या बंदिखान्यात रखडायला आलात ? काय गुन्हा केला होता तुम्ही ? देशाच्या स्वातंत्र्यासाठीच ना तुम्ही सतीचं वाण घेतलंत ? देहाच्या हाल-अपेष्टांची पर्वा न करता देशाच्या दुर्दशेची काळजी वाहावी म्हणूनच ना इथे आलात ?.... आम्ही सामान्य माणसं. पोटासाठी आत्मा विकलेली. पण आम्हांलाही वाटतं, तुमच्यासारख्या साधुपुरुषांची थोडी तरी सेवा करायची संधी मिळावी. तेवढं अल्पस्वल्प देशसेवेचे पुण्य पदरी बांधावं. त्यासाठी मी नियम सोडून वागलो. तुम्हाला हवी ती सगळी पुस्तकं आणवून दिली. आता चोरट्यासारखा धावत तुमच्याकडे ती परत मागतो आहे .... ”

जेलरच्या या बोलण्याने बाबूजीही अंतरी द्रवले. त्या माणुसकीच्या साक्षात्काराने, त्या चोरट्या देशभक्तीने ते काही वेळ अवाक् झाले. मग ती सगळी पुस्तके परत करून सौम्य वाणीने म्हणाले,

“ यापुढे चांगल्या गोष्टीसाठीही असत्याचं आचरण करू नका. गांधीजींची तुम्हां आम्हां सर्वांना हीच शिकवण आहे. ”

बाबूजींचे ते पुस्तक पुरे झाले नाही. कधीही प्रकाशित झाले नाही. प्रकाशित झाली, ती जेलच्या अधिकाऱ्यांच्या अंतरातली सुप्त देशप्रीती ! तीच त्यांना फार मोलाची वाटली. बाबूजी त्या जेलमधून सुटले.

त्यानंतर उगवले १९३४ साल. ते जणू हरिश्चंद्राचे सत्त्वहरण करायला निघालेल्या विश्वामित्रासारखे पुढे आले. त्या वर्षाने राजेंद्रबाबूंना जणू भट्टीत घालून तावले. त्यांचे सुवर्ण जणू बावन्नकशी केले.

त्या आधीच्या वर्षात पंधरा महिन्यांची शिक्षा डोक्यावर घेऊन बाबूजी

हजारीबागच्या तुरुंगात आले होते. हा तुरुंगवास यातनामय होता. त्याच्या जोडीला त्यांचा जन्माचा सोबती दमा. त्याने तर उचलच खाल्ली होती. त्यांना सारखी धाप लागत होती. या व्यथा जणू कमी पडतील म्हणूनच की काय, त्यांना आमांशाचा विकार जडला. बाबूजी या दुहेरी माऱ्याने इतके अशक्त झाले की, त्यांना चार पावले चालणेही अशक्य झाले. जेलरला त्यांची ती अवस्था बघवेना. त्याने सरकारला कळवले.

‘ राजेंद्रप्रसादांची हालत बहुत खराब आहे. त्यांना दवाखान्यांत हालवणे जरूर आहे.”

सरकार दोन महिन्यांनी जागे झाले. त्या रोगजर्जर पुरुषाला सरकारने पाटण्याच्या सरकारी इस्पितळात हालवले. तिथे त्यांना दमा अन् आमांश यांच्या जोडीला ताप येऊ लागला. सरकारने त्यांना खाजगी डॉक्टराच्याकडून उपचार घेण्याची परवानगी दिली. त्यांचे नेहमीचे डॉक्टर रोज जेलमध्ये येऊन त्यांना औषधपाणी करू लागले. नातेवाईक मंडळीही भेटायला येऊ लागली. पण काही चहाडखोर ‘ महात्मे ’ असे निघाले की, त्यांना बाबूजींचे ते दुःखातले सुखही पाहवले नाही. त्यांनी सरकारला रिपोर्ट केला.

“ राजेंद्रबाबूंचा आजार आता खूप कमी आहे. ते फक्त आजाराचा देखावा करताहेत. आप्तेष्ट त्यांना भेटायला येतात. त्यांच्या मध्यस्थीने त्यांचे बाहेरचे राजकारण चालते. सरकारने याची दखल घ्यावी.”

मायबाप ’ सरकार लगेच जागे झाले. त्याने बाबूजींची अवस्था काहीही पाहिली नाही. सरळ त्यांना उचलले अन् बांकीपूरच्या तुरुंगात नेले. त्यांना अजून औषधोपचारांची गरज होती. पण आता त्यांना त्यांचे खाजगी डॉक्टर दुरावले होते अन् ते सर्वस्वी तिथल्या सिव्हिल सर्जनच्या रामरगाड्यात सापडले होते.

आणि अशात एके दिवशी राजेंद्रबाबूंची प्रकृती एकदम बिघडली.

अत्यवस्थ झाली. सिव्हिल सर्जन घाबरला. त्याने टेलिफोनवर वरिष्ठांना कळवले, की राजेंद्रबाबूंची हालत बहुत खराब आहे, त्यांच्या खासगी डॉक्टरला ताबडतोब पाठवून द्या.

खासगी डॉक्टर आले, उपचारही सुरू झाले. अत्यवस्थपणा गेला; पण प्रकृती ताळ्यावर आली नाही. मग सिव्हिल सर्जनने सरकारला दुसरी सूचना केली. ' बाबूजींना इस्पितळातच ठेवा; तुरुंगात नको. ' सरकारने ते मान्य केले; पण बाबूजी ऐकेनात. ते म्हणाले,

" ' गडं च सासवडं चैव ' या गोष्टीचा मला आता वीट आला आहे. माझे काय व्हायचे ते इथेच होऊ द्या. या जेलच्या आवारातच ! "

सरकारने मग त्यांना आश्वासन दिले. ' आता पूर्ण आराम मिळेपर्यंत सरकार तुम्हांला हॉस्पिटलमधून हालवणार नाही.'

बाबूजी त्या हॉस्पिटलमध्ये गेले. औषधोपचार घेऊ लागले. पण प्रकृतीत म्हणावा तसा फरक पडेना. एखादे वेळी बरे असायचे. एखादे वेळी तो दमा भुतासारखा त्यांना पछाडायचा. मग एकदम अत्यवस्थ ! तशात मानसिक छळही कमी नव्हता. फक्त दोन नातेवाईक बायका त्यांच्या शुश्रूषेला असत. त्यांच्या खोलीत तिसऱ्या कोणाला फिरकू देत नसत. हो, राजकारण केले तर काय घ्या ! आठवड्यातून एकदा नातेवाइकांशी भेट. तीही तुरुंगाधिकाऱ्याच्या साक्षीने. असा हा मानसिक छळ ! कसे बरे वाटायचे बाबूजींना ! ते खूप अशक्त झाले, पराधीन झाले, दम्या-खोकल्याने जर्जर झाले.

पुनश्च सिव्हिल सर्जन काळजीत पडला. त्याने वर रिपोर्ट केला. ' बाबूजी ठीक नाहीत. पुढचे काय ते तुम्ही पाहा ! ' आणि सरकारने ताबडतोब एक तज्ज्ञ डॉक्टरांचा आयोग नेमला. डॉक्टरांचे पथक इस्पितळात आले. त्यांनी सर्व प्रकारे बाबूजींची प्रकृती तपासली. त्या कामी एक आठवडा लागला. सर्व डॉक्टरांनी एकमुखी रिपोर्ट सरकारला सादर केला.

' राजेंद्रबाबूंची तब्येत ठीक नाही. '

तो रिपोर्ट वाचून सरकार घाबरले. इस्पितळात काही अधिक आगळे झाले तर आपल्यावर तोहमत यायची. लोकक्षोभाला तोंड देता देता नाकी दम यायचा. त्यापेक्षा त्यांना सोडलेले बरे ! बाहेर काहीही होवो; आपल्याला नामानिराळे राहता येईल.

आणि सरकारने बाबूजींच्या सुटकेचा हुकूम काढला. १५ जानेवारी १९३४ रोजी तो हुकूम त्यांच्या हाती द्यायचा आणि त्यांच्यासाठी हॉस्पिटलचे फाटक उघडायचे असे ठरले. पण दुर्दैव साऱ्या बिहार प्रांताचे ! !

बाबूजींची सुटका होण्याच्या आदल्याच दिवशी बिहार प्रांताला भूकंपाचा प्रचंड धक्का बसला. प्रचंड गडगडाट ! जमीन जणू पाळण्यासारखी डोलते आहे. घरे, इमारती जमीनदोस्त होत आहेत. माणसांचे आक्रोश चालले आहेत. कोणी मरताहेत. कोणी जायबंदी होताहेत. मुलांची, नातेवाइकांची एकमेकांपासून ताटातूट होत आहे. असंख्य ढिगारे अन् त्यांच्या खाली गाडली गेलेली असंख्य माणसे. रस्त्याला भेगा पडलेल्या. त्यांतून वाळू अन् पाणी यांचे उमाळे. काय म्हणून सांगावे अन् वर्णावे ! फार मोठा भू-प्रदेश त्या भूकंपाने होत्याचा नव्हता झाला.

आणि याच हाहाकाराच्या वेळी नेमकी बाबूजींची सुटका झाली. बाबूजी बाहेर आले. त्यांच्या बरोबर आणखी काही सत्याग्रही सुटले होते. त्यांना त्यांनी बरोबर घेतले आणि भूकंपग्रस्तांच्या मदतकार्याला प्रारंभ केला. मग कुठला दमा अन् कुठला खोकला ! त्यांनी कशाची तमाच केली नाही. त्यांना जणू शरीर नावाची चीजच नव्हती. होती ती फक्त करुणा ! होती ती फक्त तळमळ ! अन् हातांना फक्त उत्साह ! बाबूजींचा आजार पळाला नाही; पण बराच मागे हटला, एवढी गोष्ट मात्र खरी !

पुढेही ते महात्माजींच्या सर्व प्रकारच्या आंदोलनांत सदैव अग्रभागी

राहिले. एका हाताने लोकसेवा अन् दुसऱ्या हाताने स्वातंत्र्ययुद्ध अशी दुहेरी भूमिका त्यांना पार पाडावी लागली. त्यात त्यांनी कधी कंटाळा केला नाही. त्यांचे जीवन हे जणू त्यांचे नव्हतेच. ते अखिल हिंदराष्ट्राचे जीवन होते.

इंग्रज निघून गेल्यावर भारत स्वतंत्र झाला हे खरे; पण त्याच्या सार्वभौम स्वातंत्र्याची घटना अजून ठरली नव्हती. ती बनविण्यासाठी एक घटना समिती नियुक्त झाली. राजेंद्रबाबूंची त्या समितीवर नियुक्ती झाली. राजेंद्रबाबूंची त्या समितीवर एकमताने अध्यक्ष म्हणून निवड झाली. राजेंद्रबाबूंनी घटना समितीचे हे तारू निराबाधपणे तीराला लावले. तो दिवस २४ जानेवारी १९५० हा होता.

त्याच दिवशी राज्यघटनेच्या प्रतीवर अध्यक्षांची म्हणजेच डॉ. राजेंद्रप्रसाद यांची सही झाली. आता पहिले काम होते राष्ट्रपतींची निवड करण्याचे. त्याही बाबतीत एकमताने बाबूजींचीच निवड झाली. डॉ. राजेंद्रप्रसाद हे स्वतंत्र सार्वभौम, भारताचे पहिले राष्ट्रपती झाले.

मग झाला त्यांच्या सत्काराचा सोहळा. तोही साधा नव्हे, तर राजशाही. त्या सोहळ्यात अनेक धुरंधर पुढाऱ्यांनी डॉ. राजेंद्रप्रसाद यांचा गुणगौरव केला. त्यांच्यावर प्रशंसेची पुष्पवृष्टी केली. त्या सर्व भाषणांना उत्तर देताना डॉ. राजेंद्रप्रसाद भरल्या गळ्याने एवढेच म्हणाले—

" प्रशंसा म्हणजे मृत्यू. असा अनुभव मागे अर्जुनाला आला होता. तोच प्रसंग आता मीही अनुभवतो आहे. खरं सांगायचं तर माझ्या प्रशंसेचा क्षण मी या सर्वोच्च पदावर आरूढ होतानाचा नव्हे. तो क्षण मी या पदावरून निवृत्त होईन त्या वेळी यायचा आहे ! "



## धर्मनिष्ठेचा आदर्श

अंगात गुडघ्यापर्यंत पोचणारा शुभ्र अंगरखा, त्यावर मानेला एक वेढा देऊन दोही अंगी सोडलेले उपरण्याचे शेव, कपाळी गंधाचा ढब्बू पैशाएवढा चंदनी टिळा आणि डोक्याला चापून चोपून बांधलेला शुभ्र साफा, अशी मूर्ती तुम्हांला दिसली की पं. मदनमोहन मालवीय म्हणून तुम्ही त्यांना प्रणाम करा. कारण ती मूर्ती एका धर्मनिष्ठ ज्ञानी पुरुषाची आहे. ती मूर्ती एका तेजस्वी देशभक्ताची आहे.

प्रयाग क्षेत्री जन्मलेल्या या भारतभूमीच्या सुपुत्राच्या ठिकाणीही तप, तेज आणि त्याग यांचा त्रिवेणीसंगम झाला होता. ते संस्कृत शिकले आणि धर्मशास्त्राचे प्राज्ञ पंडित झाले. ते इंग्रजी शिकले आणि कीर्तिवंत वकील

झाले. कोर्टात युक्तिवाद करायला उभे राहिले, की त्यांच्या भाषणाचा प्रभाव न्यायमूर्तींवरही पडल्यावाचून राहात नसे. कारण ते नेहमी सत्याची वकिली करीत. तरीही त्यांना भरपूर मासिक प्राप्ती होई. ते वकिलीच करीत राहिले असते, तर भारतातल्या नाणावलेल्या कायदेपंडितांत त्यांची गणना झाली असती.

त्यांना सार्वजनिक कामाची विद्यार्थीदशेपासूनच हौस होती. ती पुढे वाढीस लागली आणि सार्वजनिक क्षेत्रात काम करताना वकिली ही रुपेरी बेडी ठरते असे आढळून येताच त्यांनी एका शुभ दिवशी वकिलीला राम-राम ठोकला. जणू गोठ्यातली कामधेनूच त्यांनी घालवून दिली ! हे वृत्त समजताच नामदार गोखले म्हणाले,

" खरा त्याग केला मालवीयजींनी. गरीबाघरी जन्माला आले, वकील झाले, पैसा मिळवला, अमिराचे ऐश्वर्य पुढे उभे असता देशसेवेसाठी ते ठोकरून दिले ! याला म्हणावे त्याग ! "

तत्त्वाशी तडजोड नाही. धर्माशी तडजोड नाही. धर्माबद्दल विलक्षण आस्था. सदाचाराविषयी अव्यभिचारी प्रेम. कुठेही धर्मावर आघात झालेला दिसला, की ते प्रतिकारासाठी धावून जात आणि जन-आंदोलन उभारून त्यात यशस्वी होत. असेच त्यांचे दोन विजय इथे नोंदवतो.

एकदा संयुक्त प्रांताच्या सरकारने ठरवले की हरिद्वार येथे गंगेला बांध घालावा अन् तिचे पाणी कालव्यावाटे बाजूला वळवावे. सरकारने तशी तयारी सुरूही केली. ही वार्ता मालवीयांच्या कानी गेली. अनेक लोकांनी त्यांच्याकडे येऊन या बांधाबद्दल आपली नाराजी त्यांच्यापुढे प्रकट केली. लोकांना दुःख झाले होते. कारण हरिद्वारच्या पुढे गंगेचा ओघ कुंठित होणार होता. लोकांना खळाळता स्वच्छंद जलप्रवाह दिसणार नव्हता. त्यांना गंगेत मुक्त स्नान करता येणार नव्हते. त्यांच्या शतकानुशतकांच्या श्रद्धेची पायमल्ली होणार होती. गंगेविषयी भारतीयांचा भक्तिभाव किती

गहिरा असतो, हे परकी सरकारला कळत नव्हते किंवा कळूनही त्याने तिकडे दुर्लक्ष करायचे ठरवले होते.

पं. मालवीय गंगेविषयी लोकांच्या इतकेच भावार्थी होते. त्यांना लोकांचे हे धर्मसंकट जाणवले. या प्रकरणी त्यांनी सरकारशी लढा द्यायचे ठरवले. त्यांनी प्रथम एक सभा बोलावली. त्या सभेला प्रचंड गर्दी जमली. सभेत मालवीयजींचे भाषण सर्वांच्या हृदयाचा ठाव घेऊन गेले. ते म्हणाले,

"आपण या सभेत एक ठराव करून सरकारकडे पाठवू. सरकारचा गंगेला बांध घालण्याचा बेत म्हणजे या देशातील जनतेच्या धर्मभावनेवर आघात आहे, असे सरकारला कळवू. पण तेवढ्याने सरकार नमले नाही तर आपल्याला प्रचंड चळवळ उभारावी लागेल. तुरुंगात जावे लागेल. कष्ट भोगावे लागतील. आहे तुमची तयारी?"

सर्वांनी 'आहे, आहे' म्हणून त्या गोष्टीला तयारी दर्शविली. अशा अनेक सभा मालवीयांनी घेतल्या आणि आपल्या तेजस्वी वाणीने लोकांना चळवळीची स्फूर्ती दिली.

सरकारने हे सारे पाहिले. मामला गंभीर आहे, हे जाणले. लोकक्षोभाला उधाण आले, तर तो शमवणे जड जाईल हेही हेरले. पण संयुक्त प्रांताच्या गव्हर्नरांनी एक शिष्टसभा बोलावली. जयपूर, ग्वाल्हेर, बिकानेर, पतियाळा, बनारस येथील संस्थानिकांनाही सभेला पाचारले. सभेत सर्वांचे मत विचारण्यात आले. सर्वांनीच सरकारच्या धोरणाला विरोध दर्शवला. मग सरकारने आपला बेत रद्द करून जाहीर घोषणा केली. 'गंगेवर बांध होणार नाही. प्रवाह अडवला जाणार नाही!'

हा निर्णय कळताच सर्व जनतेने मालवियजींचा जयघोष केला.

त्यांचा दुसरा विजय गंगेच्याच बाबतीत आहे.

प्रयागला कुंभमेळा होता. आसेतुहिमाचल उभ्या भारतातून लक्षावधी यात्रेकरू त्रिवेणीसंगमावर स्नान करायला आले होते. पण सरकारला

आली लहर ! त्याने संगमावर स्नान करायला बंदी घातली. त्यामुळे लाखो भाविकांची मने निराशेने खिन्न झाली. संगमावर स्नान नाही म्हणजे यात्रेसाठी केलेल्या कष्टांवर पाणी. लाखो रुपयांचा जनतेवर नाहक भुर्दंड. शिवाय कोरड्या अंगाने अपेशी तोंड घेऊन घरी जायचे ही लाज !

यात्रेकरूंची ही सामुदायिक निराशा पाहून मालवीयजींचे चित्त व्यथित झाले. त्यांना वाटले, की जमलेल्या यात्रेकरूंचाच नव्हे, तर अखिल हिंदु-जातीचा हा अपमान आहे. मालवीयांनी कंबर कसली. ते स्थानिक अधि-काऱ्यांना भेटले. त्यांनी शांतपणे दाद मागितली. ते काही ऐकत नाहीत असे पाहिल्यावर मालवीयांनी प्रांतिक सरकारचा दरवाजा ठोठावला. उत्तर आले, ' सरकारचा निर्णय योग्य आहे अन् ठाम आहे.'

मालवीय म्हणाले, ' आता सत्याग्रहाशिवाय दुसरा मार्ग नाही. लक्षात ठेवा, ही जमलेली लाखो यात्रा हताश होऊन परत जाणार नाही ! '

मालवीय परत आले. त्यांनी दोनशे लोकांची तुकडी तयार केली. मालवीयही त्या तुकडीत सामील झाले. पं. मालवीय जसे प्रयागचे तसेच पं. जवाहरलालही. तेही त्या सत्याग्रहासाठी पुढे झाले. उघडपणे गंगा-मातेचा जयघोष करीत हे सत्याग्रही संगमाकडे जाऊ लागले. वाळवंटात पोचताच पोलिस अन् घोडेस्वार यांनी त्यांना वेढले. सत्याग्रही तिथे त्या वाळवंटातच बसून राहिले. सकाळ संपली. दुपार झाली. वरून उन्हे अन् खालून वाळू तापू लागली, पण सत्याग्रही उठेनात. पोलिसांचा वेढाही उठेना. सत्याग्रही कंटाळले. आता काही तरी मार्ग काढायला हवा होता. तो पं. जवाहरलाल नेहरूंनी काढला. ते एकदम उठले. एखाद्या अग्निज्वाळे-सारखे पुढे लपकले. त्यांनी पोलिसांचे कडे तोडले. ते संगमाच्या रोखाने पळत सुटले. त्यांच्या मागून पोलिस अन् घोडेस्वार त्यांना पकडायला धावले.

नकळत सत्याग्रह्यांच्या भोवतीचा वेढा भंगला. मग इतरांनी फुरसत

पाहिली नाही. ते जे उठले, ते धूम पळत सुटले. वाघाच्या तावडीतल्या वैला-सारखे. त्यांनी संगम गाठला अन् धडाधड गंगेच्या प्रवाहात उड्या घेतल्या. त्यांनी मनसोक्त स्नाने केली. पोलिस बघतच राहिले. सरकार खजिल झाले. त्याने आपला स्नान-निर्बंध मागे घेतला. सत्याग्रहाचा विजय झाला! पं. मदन मोहन मालवीय यांचा विजय झाला!

पं. मालवीय म्हणजे मूर्तिमंत सदाचार. सदाचाराला पर्याय नसतो. पण काही माणसे प्रसंगी मोहवश होतात आणि सदाचाराला तिलांजली देतात. प्रसंगी आपल्या कृतीचे समर्थनही करतात. आपण थोडी वाकडी वाट काढली म्हणून काही बिघडले नाही असेही समजतात. कारण सदाचार ही त्यांची जीवननिष्ठा बनलेली नसते. मालवीय अशा मंडळींपैकी नव्हते. आपण सदाचार सोडला, तर ते आपले नैतिक मरण आहे, असेच ते समजत होते. याविषयींचाच एक प्रसंग असा—

कलकत्ता येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाला मालवीयजी उपस्थित झाले होते. तिथे त्यांचे जे भाषण झाले, ते सर्व सभेला फार आवडले. त्या अधिवेशनात त्यांच्या अनेक थोरामोठ्यांशी ओळखी झाल्या. या थोरामोठ्यांत कालकंकरचे राजे रामपालसिंह हे एक होते. दोघेही संयुक्त प्रांतातलेच. त्या दोघांची आधी तोंडओळख होती. कलकत्ता अधिवेशनातले मालवीयांचे भाषण ऐकून त्यांनी मालवीयांचा परिचय करून घेतला. प्रयागला आल्यावर त्यांनी मालवीयांना बोलावून घेतले. ते म्हणाले,

"मालवीयजी! कलकत्याच्या अधिवेशनात तुमची बुद्धिमत्ता आणि विषयप्रतिपादनाची शैली पाहून मी खूष झालो आहे. मला तुमच्यासारख्या एका माणसाची गरज आहे. 'हिंदुस्थान' नावाचे मी एक वृत्तपत्र काढले आहे हे तुम्हाला ठाऊक असेलच. या वृत्तपत्रासाठी मला एका सहसंपाद-काची गरज आहे. हे काम तुम्ही पत्करावे अशी माझी इच्छा आहे. मी

तुम्हाला दरमहा दीडशे रुपये वेतन देईन."

पंडितजी आचारनिष्ठ. सनातनी वृत्तीचे. राजेसाहेब याच्या उलट. ते विलायतेहून येताना तिथल्या एका गौरकाय युवतीला पत्नी करून घेऊन आले होते. त्यांना खाद्यपेयाचाही विधिनिषेध नव्हता. ते भरपूर नशापाणी करीत. मालवीयांना हे सगळे ठाऊक होते. पण तरीही त्यांना राजेसाहेबांची विनंती मोडवेना. शिवाय वृत्तपत्रव्यवसायात प्रवेश केल्याने त्यांच्या बुद्धीला चतुरस्रपणा येणार होता. अनुभवाचे क्षेत्र व्यापक होणार होते. पण त्यांनी एक गोष्ट प्रथमच सांगून टाकली.

"राजेसाहेब, आपली अन् माझी वृत्ती भिन्न आहे. मी आपल्या वृत्तपत्रात सहसंपादक म्हणून काम करीन. पण तुमच्या आहार-विहाराशी संबंध ठेवणार नाही. तुमच्या बैठकीत बसल्या वेळी तुम्ही मला खाद्यपेयांच्या बाबतीत कसलाही आग्रह करता कामा नये. इतकेच नव्हे, तर तुम्ही जेव्हा नशापाणी केलेले असेल, तेव्हा तुम्ही मला आपल्यासमोर बोलावताही कामा नये. एवढं माझं पथ्य तुम्ही पाळणार असाल तर मी तुमच्या वृत्तपत्रात काम करायला राजी आहे."

राजेसाहेब हसले. म्हणाले, 'तुमची ही अट मला मान्य आहे.'

मालवीय पदवीधर होऊन प्रयागच्या एका हायस्कुलात अध्यापनाचा व्यवसाय करीत होते. ती नोकरी त्यांनी सोडली आणि ते 'हिंदुस्थान'च्या सहसंपादकाच्या जागेवर रुजू झाले. जागा सहसंपादकाची; पण काम सगळे संपादकाचे. ती जोखीम त्यांनी शिरावर घेतली. राजेसाहेबही तसे दिलदार होते. ते मालवीयांना दीडशेच्या ऐवजी दोनशे रुपये देऊ लागले. मालवीयांनीही आपले बुद्धिचातुर्य पणाला लावून 'हिंदुस्थान'ला लौकिक प्राप्त करून दिला. त्या पत्राचा खपही वाढवला.

राजेसाहेब मालवीयांच्या बुद्धिमत्तेवर अन् कार्यनिष्ठेवर खूष झाले. अडीच वर्षे मालवीयांनी 'हिंदुस्थान'चा कारभार संभाळला.

पुढे एके दिवशी काही जरूरीच्या कामासाठी राजेसाहेबांनी मालवीयांना आपल्याकडे बोलावले. मालवीय त्यांच्या पुढे गेले. पण राजेसाहेब त्या वेळी मद्याच्या नशेत होते. ते काय बोलत होते ते त्यांचे त्यांनाच कळत होते, की नाही देव जाणे ! मालवीयांनी ते सगळे ऐकून घेतले अन् ते निर्धारवचन बोलावे तसे बोलले,

"राजेसाहेब ! मी तुमच्याकडची चाकरी पत्करण्यापूर्वी तुमच्या-आमच्यात एक करार झाला होता. तुम्ही नशापाणी केलं असेल, त्या वेळी मला बोलवायचं नाही, असं आपलं ठरलं होतं. तो करार तुम्ही आज मोडलात. तेव्हा तुमच्याकडचा माझ्या अन्नपाण्याचा ऋणानुबंध संपला. मी लेखणी खाली ठेवली. उद्या तुमच्या वृत्तपत्रकचेरीत मी असणार नाही. मी माझ्या मार्गाने निघालो."

राजेसाहेब चरकले. त्यांची नशाही खाडकन उतरली. त्यांनी मालवीयांची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला. पुन्हा अशी गोष्ट घडणार नाही असे परोपरींनी सांगितले. पण मालवीयांचा निर्धार बदलला नाही.

त्यांना मालवीय हवे होते. ते त्यांना खूप आवडतही होते. ते निघून जाण्याने त्यांच्या वृत्तपत्राची खूप हानी होणार होती. पण त्या गोष्टीला निरुपाय होता. करार त्यांनीच मोडला होता आणि मुख्य म्हणजे त्याची त्यांना जाणीव होती.

राजेसाहेबही मोठ्या मनाचे. ते मालवीयांना म्हणाले,

"तुम्ही जाणार तर जा. मी तुम्हाला अडवू शकत नाही. पण एकच गोष्ट सांगतो. तुमच्याबद्दल माझ्या मनात नितांत आदर आहे. तुमची बुद्धिमत्ता आणि निष्ठेने काम करण्याची पद्धत या गोष्टी स्पृहणीय आहेत."

मालवीय उत्तरले, "मी आपल्या सौजन्याबद्दल आभारी आहे !"

"एवढ्यानंच माझं बोलणं संपलं नाही. तुम्हांला फार मोठा भविष्यकाळ

आहे. पण तुम्ही शिकलं पाहिजे. नुसतं बी. ए. राहून नाही चालायचं. तुम्ही वकील व्हा."

"महाराज, वकील होणं सोपं नाही. मी गरीब घरात जन्म घेतला आहे. दारिद्र्याचे चटके सोशीत सोशीत इथवर आलो आहे."

"तुम्हांला अपमान वाटणार नसेल, तर सांगतो. तुमच्या वकिलीच्या कॉलेजचा खर्च आम्ही करू."

राजेसाहेबांची प्रामाणिक प्रेमभावना मालवीयांनी जाणली. त्यांनी राजेसाहेबांची मदत नाकारली नाही. ते लगेच कॉलेजात दाखल झाले. आणि यथाकाली वकीलही झाले.

मानवीय म्हणजे मूर्तिमंत निःस्पृहता. वाराणसीला त्यांनी हिंदू विश्वविद्यालय स्थापले आणि त्यासाठी लक्षावधी रुपये गोळा केले. काही लोक त्यांना थोड्याशा थट्टेने म्हणत, 'मालवीयांसारखा खट याचक दुसरा कोणी झाला नसेल. एखाद्या बड्या आसामीकडून स्वतःच्या इच्छेप्रमाणे मदत मिळवायची म्हणजे तेवढा आकडा घेऊनच ते बाहेर पडत. पण व्यक्तिगत स्वार्थ मात्र त्यांना कधीही शिवला नाही. ते कोणाच्या तनसडीचे मिंधे राहिले नाहीत. ते जरी राष्ट्रीय चळवळीत होते, तरी त्यांच्या शब्दाला सरकारदरबारी वजन होते.

आणि हे ज्यांना माहीत होते अशांपैकी एक संस्थानिक एके दिवशी त्यांच्याकडे आले. त्यांचे काम महत्त्वाचे होते आणि मालवीयांनी शब्द टाकला तर ते सहज घडण्याजोगे होते. म्हणून त्यांनी पाच लाख रुपयांची थैली मालवीयांपुढे ठेवली अन् त्यांना म्हटले,

"माझं एक काम करायला पाहिजे तुम्ही. तुमच्या शब्दाने ते सहज होईल. त्यासाठी ही अल्पशी भेट आहे. पाच लाख आहेत."

त्या संस्थानिकांना वाटले होते, की मालवीयांच्या तोंडाला पाणी सुटेल.

मासा हुरळेल अन् गळाला लागेल. पण झाले उलटेच. मालवीयांची मुखमुद्रा अप्रसन्न झाली. त्यांच्या कपाळी आठ्या पडल्या. ते म्हणाले.

"राजेसाहेब, हे विष आधी इथून उचला. मला त्याचा स्पर्श नको, दर्शनही नको. उचला ते आधी."

चाबकाचा फटकारा बसावा, तसे त्या संस्थानिकांना झाले. त्यांनी ती रक्कम उचलून अंगरख्याच्या खिशात ठेवली. मग मालवीय त्यांना म्हणाले,

"आता बोला तुमचं काम. ते अनीतीचं नसलं, तर मी तुम्ही सांगाल तिथे माझा शब्द टाकीन !"

अशी होती मालवीयांची सडेतोड निःस्पृहता. त्यांचे विश्वविद्यालय स्थापन झाल्यावर कोणी त्यांना व्यक्तिशः काही दिले तरी ते विद्यालयाच्या निधीत ते जमा करीत. त्यांच्या पत्नीला नेपाळच्या महाराणींनी एक कस्तूरीचा हार भेट म्हणून दिला होता. पण मालवीयजींनी तो उचलला अन् विद्यालयाच्या निधीला समर्पण केला.

भारतीय तरुणांविषयी त्यांचे विचार कसे होते अन् किती मोलाचे होते, त्याची एक वानगी सांगतो ते तरुणांना उपदेश करीत—

"युवकांनो ! तुमच्या ठिकाणी देशभक्ती अन् ईशभक्ती दोन्ही असल्या पाहिजेत. त्याशिवाय तुम्हांला तरणोपाय नाही. देशकल्याणासाठी झट-णाऱ्या प्रत्येक युवकाचे अन् युवतीचे शरीर बलवान असले पाहिजे. स्वराज्य टिकवायचे असेल तर शरीरसंपत्ती वाढवणे आवश्यक आहे. कारण जो बलवान तोच स्वतंत्र राहू शकतो.

आपल्या लोकांना वार्धक्य लवकर येते. याउलट पाश्चात्यांची स्थिती आहे. ते न लाजता न कंटाळता, वार्धक्यातसुद्धा व्यायाम घेतात. आपण इंग्रजी शिकून नको ते घेतले; पण त्यांचे गुण मात्र उचलले नाहीत.

आपल्याकडे पूर्वी सकाळी स्नान झाल्याबरोबर नमस्कार घालायची

पद्धत होती. आता ती बंद झाली आहे. तिचे पुनरुज्जीवन झाले पाहिजे. प्रत्येक तरुण-तरुणीने नमस्कार घातलेच पाहिजेत. व्यायामाने बलवान झालेच पाहिजे!"

मित्रहो! मालवीयांनी 'परोपदेशे पांडित्यं' कधी केलं नाही. दुसऱ्याला केलेल्या उपदेशाप्रमाणे ते स्वतः वागले. 'आधी केले, मग सांगितले!'



## रोजनिशी; पण तुरुंगातली

लो. टिळकांच्या निधनानंतर थोड्याच दिवसांत कलकत्ता येथे काँग्रेसचे एक खास अधिवेशन भरले. या अधिवेशनात गांधीजींनी सरकारशी असहकार पुकारण्याचा ठराव मांडला अन् तो संमत करून घेतला. त्यामुळे देशात एक नवे वारे संचारले. गांधीजी हे देशाचे नेते बनले. अशात १९२१ साल उजाडले. देशात कायदेभंगाचे वातावरण निर्माण झाले.

सरकारला ही गोष्ट परवडण्याजोगी नव्हती. त्याने देशभर धरपकड सुरू केली. मोठमोठे पुढारी पकडून त्यांच्यावर राजद्रोहाचे खटले भरले. त्यांना लहान-मोठ्या अवधीच्या शिक्षा सुनावल्या. गांधींजीचे अत्यंत निकटवर्ती असे पुढारी दे. भ. राजगोपालचार्य हेही या धरपकडीत सापडले. सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांना तीन

महिन्यांची सजा दिली. त्यांना वेलोर येथील तुरुंगात ठेवण्यात आले.

पण राजाजी काही एकटेच तिथले कैदी नव्हते. अनेक लोक सत्याग्रह करून वेगवेगळ्या मुदतीची शिक्षा भोगण्यासाठी तिथे दाखल झाले होते. त्यांत सुशिक्षितही होते.

त्यामुळे त्यांच्यांत भांडणाचे आणि अंतर्गत कलहाचे प्रसंग वारंवार येऊ लागले. मग राजाजींनी ठरवले, की या सर्व राजबंद्यांचे काही तरी करायचे. हे लोक थोडे बहुश्रुत होऊन अन् थोडे विचारी होऊन बाहेर पडले पाहिजेत.

म्हणून मग त्यांनी वेलोरच्या त्या तुरुंगात एक अभ्यासवर्ग सुरू केला. ते चांगली पुस्तके त्यांना वाचून दाखवू लागले. नित्य काही तरी शास्त्रीय माहिती सांगू लागले. गीतेचे काही श्लोक वाचून त्यांचा अर्थ समजावू लागले. सर्वांना त्या अभ्यासवर्गाची गोडी लागली. सगळे राजाजींना धन्यवाद देऊ लागले.

याच शिक्षेच्या कालावधीत राजाजी नेमाने आपली रोजनिशी लिहीत. ही त्यांची रोजनिशी जेल डायरी या नावाने मद्रासच्या स्वराज्य प्रेसने १९२२ साली प्रसिद्ध केली. त्या डायरीतली काही पाने श्री. रा. प्र. कानिटकर यांनी राजाजी या चरित्रपुस्तकात प्रसिद्ध केली आहेत—

दि. २१-१२-१९२१

आज दुपारी १ वाजता माझ्या खटल्याचा निकाल लागला. मला तीन महिन्यांची शिक्षा झाली. मला या गोष्टीची अटकळ होतीच. मी त्या तयारीनेच कोर्टात आलो होतो. मला आवश्यक असलेल्या वस्तू मी बरोबर आणल्या होत्या. कागद, पेन्सिली, शाई, फाउंटन पेन, ही लेखनसामग्री घेतली होती. मला नेहमी लागणाऱ्या लवंगाही घेतल्या होत्या. पुस्तकामध्ये बायबल, शेक्सपियरची काही नाटके, तिरुवल्लुवर, महाभारताचा तमिळ अनुवाद अन् त्याचाच

इंग्रजी अनुवाद आणि रॉबिन्सन क्रूसो ही पुस्तके आवर्जून घेतली होती.

एकदा या कारावासात राजाजींची प्रकृती बिघडली. त्यांचा दमा चाळवला. त्यांना तापही येऊ लागला. सरकारने मग त्यांना एका इस्पितळात दाखल केले. त्या संदर्भात राजाजी लिहितात—

दि. ३-१-१९२२

पहाटे तीन वाजता माझा ताप उतरला. हे हॉस्पिटल तुरुंगातल्या त्रासाला शोभेल असेच आहे. हॉस्पिटल म्हणजेही एक प्रकारचा तुरुंगच. माझ्या वॉर्डात १२ खाटा आहेत. सगळ्या खिडक्यांना गज आणि जाण्यायेण्यासाठी एकच दार! सगळ्या बिछान्यांतून ढेकणांच्या वसाहती. तुरुंगाप्रमाणेच इथेही आम्हाला संध्याकाळीच बंद करण्यात येते. स्वच्छता हा शब्दच या हॉस्पिटलमध्ये नाही. मागच्या बाजूस मोठी मुतारी आहे अन् शौचासाठी मोठी मडकी ठेवली आहेत. रात्रौ हा भाग म्हणजे शुद्ध नरक बनतो. मात्र सकाळी सर्व घाण साफ करून फिनेल टाकतात, एवढे बरे आहे.

राजाजींच्या पायाला काही तरी दुखणे झाले होते. डॉक्टरांनी त्याच्यावर जे इलाज केले, ते त्यांना प्रतिकूल पडले. त्याविषयी थोड्याशा उपहासाने राजाजी लिहितात—

दि. ६-१-१९२२

माझ्या पायाला लावलेल्या मलमाने गुण येण्याऐवजी पायाला फोडच आले. ते कढत पाण्याने शेकायला सांगितले, त्यामुळे तर मला खूप त्रास झाला. त्यातच डॉक्टरांनी वर कॅरबॉलिक ॲसिड लावले. मग काय विचारता! मला त्या यातना असह्य झाल्या. पण मी या हॉस्पिटलात आलो आहे तो काही रुग्ण म्हणून नव्हे. मी आहे एक कैदी. माझ्या आरोग्याची काळजी घेणे हे काही सरकारचे

कर्तव्य नाही. सरकार हे सारे दया म्हणून करते आहे. येन केन प्रकारेण माझा छळ करणे हे जर सरकारी कायद्यात बसत असेल, तर मग बोलणेच खुंटले.

हा अवघ्या ९० दिवसांचा तुरुंगवास; पण राजाजींनी एवढ्याच अवधीत ब्रह्मांड अनुभवले. अनेक प्रिय जनांच्या आठवणीने त्यांनी निसासे टाकले अन् गांधीजींच्या एका पत्राने त्यांना उमेदही आली. ते लिहितात:

दि. २६-१-१९२२

मला माझ्या आईची अधून मधून आठवण होते. तशी ती झाली की मी सुखावतो अन् मग माझा सबंध दिवस आनंदात जातो. तिचा मी लाडका मुलगा. तिचा आशातंतू. पण तोच आज एका सर्वसामान्य तुरुंगात म्हणजेच गुन्हेगारांच्या जगात खितपत पडला आहे. पण ही गोष्ट तिच्या कल्पनेतही कधी येणार नाही.

देशात स्वातंत्र्याचा लढा चालू आहे. या लढ्यात हाल-अपेष्टा आहेत, हे खरे; पण त्यांनाही एक प्रकारचे सौंदर्य आहे. शिवाय अशा हालअपेष्टांची जरूरी आहे, असे मी तिला सांगत आहे, अशी मी कल्पना करीत बसतो.

आणि माझा दुसरा प्राण! माझी पत्नी! ती तर या जगातून निघून गेली आहे. मी सध्या कुठे आहे याची तिला अंधुकसुद्धा कल्पना येणार नाही. आजवर मी अनेक आरोपींना तुरुंगवासापासून सोडवले, याबद्दल तिला माझ्याबद्दल खूप अभिमान वाटत होता. पण त्याच तुरुंगात खितपत पडण्याचा आज माझ्यावर प्रसंग आला आहे, हे तिच्या स्वप्नातही येणार नाही. असले विचार निरर्थक आहेत. पण त्यांनीच माझे मन भरून जात आहे. त्यात एक प्रकारचे समाधानही आहे.

दुपारी मला श्वासोच्छ्वासाचा खूप त्रास होतो; पण रात्री बरे वाटते. मला वाटते, मी फार अशक्त झालो आहे. मला छळणारा दमा अजूनही माझी पाठ सोडीत नाही. दिवसा तर तो फारच छळतो. थोड्याशा हालचालीनेही मला त्रास होतो.

आज घरून एक पत्र आले. त्याच्याबरोबरच बार्डोलीहून आलेले गांधीजींचेही एक पत्र होते. मात्र त्यात राजकारणाचा एकही शब्द नाही. ते आपल्या पत्रात लिहितात—

'तुमची चिठी मिळाली. त्याबद्दल आनंद वाटला. तुम्हांला वृत्तपत्रे मिळत नाहीत हे समजले. पण त्यामुळे तुमचे काहीच नुकसान नाही. तुमच्यापाशी चरखा आहे अन् रामायण आहे. याचाच मला मोठा हेवा वाटतो. तुमचे रामायण हे वाल्मीकीच्या रामायणाचे रूपांतर नाही, तर ते मूळ कंबनचे रामायण आहे, हे मला माहीत आहे. मी पोपच्या तमिळ हँडबुकमध्ये त्यासंबंधी पुष्कळ वाचले आहे.... तुमचे वजन कमी होऊ देऊ नका. आपणां सर्व मंडळीत मीच सर्वांत कमी वजनदार आहे, असे मी समजत होतो; पण तुम्ही माझ्यावर ताण केली आहे. माझ्यापेक्षा १० पौंडांनी तुम्ही आपले वजन खाली नेले आहे. तुम्हांला तिथे दूध मिळत असेल, अशी मला आशा आहे. नसेल तर तुम्ही मागून घेतले पाहिजे. तुम्हांला जर दूध मिळाले, आणि संत्री, द्राक्षे अशासारखी रसाळ फळे मिळाली तर तुमचा दमा हटेल आणि तुमचे वजनही वाढेल. देवदास सध्या अलाहाबादला आहे. क्रिस्तोदास अन् रामदास माझ्याजवळ आहेत. ते माझी काळजी घेतात. तुम्ही एकटेच एकांतवासाचा उपभोग घेत आहा असे समजू नका. सुंदरमने सध्या आश्रमात मौन धारण केले आहे.

—तुमचा प्रिय मित्र मो. क. गांधी.'

दि. १८।३।२२

"मी आता दोन दिवसांनी तुरुंगातून मुक्त होणार आहे. या तुरुंगवासाबद्दल मला स्पष्टपणे म्हणावेसे वाटते, की मी तुरुंगात हे जे तीन महिने घालवले, ते माझ्या जीवनातले सर्वांत सुखाचे दिवस होते."

राजाजींची विद्यार्थीदशेतलीही एक गोष्ट सांगण्याजोगी आहे. त्या गोष्टीवरून दिसते, की विद्यार्थीदशेपासूनच त्यांना व्यापक तितकाच सूक्ष्म विचार करण्याची सवय लागली होती.

१९०१ सालची गोष्ट. राजाजी त्या वेळी तेवीस वर्षांचे होते. त्या वर्षी स्वामी विवेकानंद मद्रासला आले होते. त्या वेळी विद्यार्थ्यांपुढे त्यांचे एक व्याख्यान झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना जणू काय मंत्रमुग्ध करून सोडले. व्याख्यान झाल्यावर स्वामींनी विद्यार्थ्यांच्या बुद्धीची थोडीशी परीक्षा पाहण्यासाठी गमतीने विचारले,

" श्रीकृष्णाचा रंग निळा का ? "

बहुतेक श्रोते हा प्रश्न ऐकून गडबडले. कोणालाही उत्तर सुचेना. सभागृहात स्तब्धता पसरली. इतक्यात राजाजी उठून उभे राहिले. त्यांनी उत्तर दिले.

" श्रीकृष्णाचा रंग निळा आहे याचं कारण तो अनंत आहे. जे अनंत असते, त्याचा रंग निळाच असतो."

" उदाहरण सांगाल ? " स्वामींनी विचारले.

" अवश्य ! महासागर अनंत आहे. त्याचा रंग निळा आहे. आकाश अनंत आहे. म्हणून तेही निळेच आहे."

" छान ! छान ! तुझ्या बुद्धिमत्तेचं कौतुक आहे ! " स्वामीजींनी राजाजींची पाठ थोपटली.

राजाजी १९४८ साली भारताचे गव्हर्नर जनरल झाले. हे शेवटचे

गव्हर्नर जनरल होत. १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. याचा अर्थ त्याला ब्रिटिश सत्तेखाली वसाहतीच्या स्वराज्याचे हक्क मिळाले. स्वतंत्र सार्वभौम भारताची राज्यघटना बनून ती लागू झाल्यानंतर भारत स्वतंत्र सार्वभौम बनणार होता. या मध्यंतरीच्या काळात औपचारिकतेचा भाग म्हणून इंग्लंडच्या बादशहाने भारताच्या गव्हर्नर जनरलपदी राजाजींना नियुक्त केले होते. लॉर्ड माउंटबॅटन आपली अधिकारसूत्रे राजाजींच्या हाती सुपूर्द करून निघून गेले होते.

संन्यस्त वृत्तीचे वैराग्यशील राजाजी दिल्लीच्या अतिभव्य राजप्रासादात राहायला गेले. त्यांची साधी वागणूक तिथेही सुटली नाही. त्यांना त्या काळात वीस हजार रुपये मासिक वेतन होते. त्यांतले सात हजार रुपये स्वतः होऊन त्यांनी कमी केले.

२६ जानेवारी १९५० रोजी दिल्लीच्या राष्ट्रपति-भवनात दरबार भरला. या प्रसंगी राजाजींनी भारत संपूर्ण, सार्वभौम प्रजासत्ताक राष्ट्र झाल्याची घोषणा केली आणि राष्ट्रपती या नात्याने डॉ. राजेंद्रप्रसाद यांना राष्ट्रपतींच्या सिंहासनावर अधिष्ठित केले.

१९७१ साली ‘ राजाजी ९३ ’ या नावाने त्यांचा एक गौरव ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्याचे प्रकाशन करताना आचार्य विनोबा भावे यांनी जे भाषण केले त्यात त्यांनी त्यांच्या महनीयत्वावर नेमका प्रकाश टाकला आहे. विनोबा सांगतात—

“ ते कायदेपंडित आहेत. घटनेचे त्यांनी सखोल अध्ययन केले आहे. ते मानसशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ आहेत ........ एवढे सारे पैलू त्यांच्या जीवनाचे आहेत. परंतु मला ज्या पैलूचे सर्वांत अधिक आकर्षण आहे तो आहे आध्यात्मिक पैलू. त्यांनी तमिळ भाषेत जे साहित्य लिहिले आहे, ते मूळ त्याच भाषेत वाचण्याची संधी मला मिळाली आहे. .... राजकारणावर

त्यांनी जे लिहिले आहे, ते टिकणार नाही. परंतु त्यांनी जे आध्यात्मिक साहित्य, विशेषतः तमिळ भाषेत जे लिहिले आहे, ते टिकेल आणि बराच काळपर्यंत चालेल.''

♣ ♣



## आर्यसमाजाचा जनक

महर्षी दयानंद सरस्वती या नावाने पुढील आयुष्यात जे देशभर प्रकाशमान झाले, त्यांचा जन्म एका औदीच्य ब्राह्मणकुळात झाला. काठेवाडातल्या मोरवी संस्थानात ते जन्मले. त्यांच्या वडिलांचे नाव अंबाशंकर होते. आणि त्यांनी आपल्या सुपुत्राचे नाव मूळशंकर असे ठेवले होते.

या दोन्ही नावांवरून कळते, की त्या कुळात शिवभक्ती होती. ते घराणेच कट्टर शैव होते. शिवाचा जप, शिवाचे ध्यान, शिवाची पूजा, शिवासाठी जागरण, शिवासाठी उपवास असे सगळे त्या घरचे शिवार्पण होते. अंबाशंकर पिढीजात जमीनदार. शिवाय त्यांचा सावकारीचा धंदा. त्यामुळे ही सारी शिवव्रते त्यांना झेपत होती.

मूळशंकराची आठव्या वर्षी मुंज केल्यावर अंबाशंकरांनी त्यालाही शिवोपासनेच्या नेमधर्मात ओढले. ते रोज त्याच्याकडून पार्थिव लिंगाची पूजा करून घेत. त्याला शिवस्तोत्रे शिकवीत. रुद्राध्यायाची संथा देत. त्याला बरोबर घेऊनच शिवदर्शनाला, कथा-कीर्तनाला जात. त्याला सदोदित आपल्या बरोबर ठेवीत.

मूळशंकरही शिकवल्याप्रमाणे आपले नेमधर्म पाळी. लहान वयातच त्याने बरेच अध्ययन पुरे केले. विशेष म्हणजे त्याच्या ठिकाणी त्या कुमार-वयातच तर्कशक्ती जागृत झाली. ' बाबावाक्यं प्रमाणम् ' हे तो मानायला तयार नसे. प्रत्येक घटनेच्या मुळाशी काय आहे, याचा शोध घेण्याची निखळ बुद्धी त्याच्या ठिकाणी दिसायला लागली होती. बुद्धीला पटेल ते खरे, पटणार नाही ते खोटे, इथवर त्याची मजल आली होती. बापाच्या पुढे तो केवळ त्यांच्या आदरामुळे असले काही बोलत नव्हता; पण जे बोलले जात नव्हते ते त्याच्या श्रद्धेला पोखरीत खोल खोल जात होते.

तशात एके दिवशी आली महाशिवरात्र. ते आठही प्रहर म्हणजे शिवभक्तांच्या पूजेअर्चेचे, अभिषेकाचे, स्तोत्रपाठाचे. त्या रात्री आलोचन जाग्रण. जोडीला यामपूजा. मूळशंकर अवघा तेरा वर्षांचा; पण अंबा-शंकरांनी त्याच्याहीकडून त्या दिवशी कडकडीत व्रत करून घ्यायचे ठरवले. मूळशंकर आपल्यापेक्षा सवाई शिवभक्त व्हावा ही मनीषा त्यांनी आपल्या मनात जोपासली होती. त्यामुळे पत्नीचा विरोध असताही त्यांनी मूळशंकराला मंदिरात नेऊन बसवले. ' रात्री डोळ्यांवर पेंग येऊ देऊ नको. जागरण म्हणजे जागरण.' असे त्याला बजावले.

मूळशंकर म्हणाला, ' ठीक आहे.' तो मंदिराच्या गाभाऱ्यात शिवलिंगा-जवळ बसून राहिला. एवढ्यात मध्यरात्र उलटायला आली. पण मूळशंकराचे डोळे तकतकीत होते. त्याने आपली झोप झडझडून टाकली होती.

शिवलिंगावर पाना-फुलांचा ढीग होता. उदबत्त्या जळत होत्या. नंदादीप तेवत होता. पुढे नैवेद्याच्या वाट्या होत्या. हे एका उंदीरमामाने हेरले आणि त्याने कोपऱ्यातल्या फटीतून हळूच डोके वर काढले. एकवार चूं चूं करून अंदाज घेतला. त्याला वाटले, पुढे जायला हरकत नाही. तो सुळुपुळू करीत पुढे आला. मूळशंकरचे त्याच्या हालचालीवर ध्यान राहिले.

उंदराने प्रथम देवापुढच्या नैवेद्याचा फडशा पाडला. मग तो शिव-

लिंगावरची फूलपत्री उसकटू लागला. लिंगाच्या डोक्यावर बसून त्याला चढू अंगी चाटू लागला.

मूळशंकरने हे सगळे उघड्या डोळ्यांनी पाहिले. दिवसा आपण ज्याची मनोभावे यामपूजा केली, त्याच्या डोक्यावर एक उंदरासारखा क्षुद्र जीव नाचतो आहे, त्याची पूजा विसकटतो आहे, हे दृश्य त्याला अद्भुत वाटले. त्याच्या मनाला ते लागले. त्याची बुद्धी सळसळू लागली—

ज्याच्या पराक्रमाचे पोवाडे अन् कथागाथा आपण गातो, ऐकतो, तोच हा सर्वसमर्थ महादेव काय? आपल्या शत्रूंना धूळ चारणारा शीघ्रकोपी महारुद्र तो हाच काय?....मग याला एका यःकश्चित उंदराचा, डोक्यावर नाचणाऱ्या उंदराचा, संहार करता येऊ नये काय? मग हा कसला महादेव? कसला भगवान? छेः! हे पाषाणलिंग म्हणजे शिवशंकर नव्हेच. तो वेगळा असला पाहिजे अन् वेगळ्या ठिकाणी असला पाहिजे....कुठं बरं असेल त्याचा निकास!"

मूळशंकरने घडला वृत्तान्त वडिलांना सांगितला. अन् विचारले, "पाषाणलिंगात देवच नाही असं मला वाटतं. मग कुठे असेल तो?"

आपल्या मुलाच्या मनात अश्रद्धा उत्पन्न झाली, तो भलतेच तर्क लढवू लागला, या गोष्टीचे अंबाशंकरांना परम दुःख झाले. ते आपल्या मुलाच्या शंकांचे समाधान करण्याऐवजी त्याच्यावर संतापलेच.

मूळशंकर मनात म्हणाला, 'वडिलांवर विसंबणे बरे नव्हे. आपणच वेद-शास्त्राचे अध्ययन करून आपल्या शंका निरसून घेतल्या पाहिजेत.' मूळ-शंकरला अध्ययनाची ओढ लागली. त्याने अध्ययनासाठी काशीला जायचे ठरविले. पण त्या बाबतीत त्याची आई आड आली. ती आपल्या एकुलत्या मुलाला इतक्या दूर पाठवायला अन् दृष्टीआड करायला तयार नव्हती. शेवटी मोरवीजवळच दोन मैलांवर असलेल्या एका पंडिताच्या घरी मूळ-शंकरने जावे असे ठरले. तो तिथे जाऊ लागला. मन लावून वेदाध्ययन

करू लागला. गुरुजींना त्याच्या अभ्यासू वृत्तीचे कौतुक वाटू लागले. हा शिष्य त्यांना आवडू लागला.

एके दिवशी सहज बोलता बोलता मूळशंकर गुरुजींना म्हणाला, "मला अंतिम सत्याचा शोध घ्यायचा आहे. त्यासाठी मी लवकरच संन्यास घेणार आहे."

एका मालदार गृहस्थांचा मुलगा संन्यास घेऊ पाहतो, हे त्या गुरुजींना विस्मयजनक वाटले. त्यांनी ती वार्ता अंबाशंकरांच्या कानी घातली. त्या बातमीने साऱ्या घराला मोठा धक्काच बसला. 'असं होता कामा नये. मुलगा वाया जाता कामा नये.' घरदार म्हणू लागले.

मग करायचं काय ? उपाय कोणता ? उपाय एकच. मूळशंकराचे लग्न करून टाकणे. संसाराची बेडी त्याच्या पायांत अडकवणे. मग कुठे जाईल ! नाइलाजाने का होईना, त्याला संसार हा करावाच लागेल.

आईबाप आपल्याला चतुर्भुज करायला निघाले आहेत हे मूळशंकराला समजले. आता काय करायचे ? वडिलांच्या समोर त्यांच्या इच्छेचा अवमान करणे शक्यच नव्हते. त्या घराची शिस्तच तशी कडक होती.

मग काय ? पळून जाणे एवढा एकच मार्ग ! आणि तोच मूळशंकरने अनुसरला. तो त्याच रात्री अंधाराचा फायदा घेऊन घरातून बाहेर पडला. कधी खेडेगावातून तर कधी रानावनातून मार्ग काढीत सोमाली या गावी पोचला. तिथे त्याला एक योगी भेटला. त्याने मूळशंकरला प्रथम ब्रह्मचर्याची दीक्षा देऊन मग योगविद्येचे पाठ द्यायला प्रारंभ केला. काही दिवस सोमालीला राहून मूळशंकर सिद्धपूरला आला. तिथे लवकरच एक धार्मिक मेळा भरणार होता. सर्व देशातले साधू, बैरागी, तडी, तापसी तिथे येणार होते. मोठाच सत्संग चालणार होता. या सत्संगाचा लाभ मिळविण्यासाठी मूळशंकर तिथे दाखल झाला होता अन् एका धर्मशाळेत उतरला होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी अंथरुणावर उठून बसतो तो अंबाशंकर

त्याच्यापुढे दत्त म्हणून उभे. बरोबर तीन-चार नोकर. आपल्या मुलाची ती फटिंग अवस्था पाहून त्यांना दुःखही झाले अन् क्रोधही आला. ते मूळशंकरला तडातडा बोलले. बोलता बोलता प्रेमाने गहिवरले.

मूळशंकरला तो सारा प्रकार असह्य झाला. त्याने पाय धरून वडिलांची क्षमा मागितली. ' उद्या आपल्याला घरी जायचं आहे ! ' ते मूळशंकरला उद्देशून म्हणाले. त्यांनी नोकरांना बजावले, ' याच्यावर लक्ष ठेवा ! '

रात्रौ नोकर मूळशंकरला मधे घेऊन झोपले. मूळशंकरवर हे एक मोठेच संकट होते. आता घरी जाणे म्हणजे चक्रव्यूहात सापडणे. आपल्या सर्व महत्त्वाकांक्षांचा मृत्यू डोळ्यांनी पाहणे. या विचारांनी त्याची झोप पार उडाली होती. तो पुनश्च पलायनाचा विचार करीत होता. सेवक निद्राधीन होण्याची वाट पाहात होता. त्यांना गाढ झोप लागली हे समजताच तो उठून बसला. त्याने सावधपणे कानोसा घेतला. सगळीकडे शांत अन् निर्धास्त आहे असे दिसून येताच त्याने हळूच तिथून पळ काढला.

सिद्धपुराहून मूळशंकर सरळ नर्मदातीरावर आला. तिथे त्याला पूर्णानंद नावाचे एक संन्यासी भेटले. मूळशंकराच्या विनंतीवरून पूर्णानंदांनी त्याला संन्यासदीक्षा दिली. दयानंद सरस्वती असे त्याचे नाव ठेवले. दयानंदांनी काही काल पूर्णानंदांच्या सान्निध्यात राहून बरेचसे शास्त्राध्ययन केले. पण त्यांचे समाधान होईना. शंका फिटेनात.

दयानंद मग तिथूनही निघाले. विंध्यपर्वतात हिंडले. हिमालयात गेले. तिथेही खूप भ्रमंती केली. त्यांना सर्व शंका फेडणारा, चित्ताला समाधान देणारा सद्गुरू हवा होता. पण तोच कुठे भेटेना.

मग ते हिमालय उतरले. मथुरेला आले. तिथे विरजानंद नावाचे एक संन्यासी होते. ते दोही डोळी अंध होते; पण ज्ञानचक्षूंनी डोळस होते. दयानंद त्यांना शरण गेले. त्यांच्यापाशी खूपसे शिकले. विरजानंदांची काही मते ठाम होती. त्यांना वेदांबद्दल परम आदर होता; पण पुराणांबद्दल

विलक्षण तिटकारा होता. वेदांनी सांगितला तेवढाच धर्म खरा; अन् पुराणांनी सांगितलेला धर्म म्हणजे सगळा फापटपसारा असे ते समजत. त्यांचा मूर्तिपूजेलाही प्रखर विरोध होता. आपले हे सारे तत्त्वज्ञान त्यांनी अध्यापनाच्या द्वारे दयानंदांच्या हृदयात ओतले. दयानंदांना ते पटले. ते प्रभावित झाले. गुरुचरणांना स्पर्श करून त्यांनी प्रतिज्ञा केली.

" गुरुदेव, यापुढे मी माझं सारं आयुष्य वेदप्रणीत धर्माची प्रतिष्ठा करण्यासाठी खर्च करीन ! वेदांच्या चरणी माझं जीवन अर्पण असो ! "

इ. स. १८७५ साली दयानंदांनी मुंबई येथे आर्यसमाज या संस्थेची स्थापना केली. आपल्या विचारांनाही संघटित रूप दिले. संस्थेच्या प्रचारासाठी भारतभर दौरे काढले. शिक्षणाचे माध्यमही हाती घेतले. समाजातर्फे त्यांनी अनेक ठिकाणी वैदिक विद्यालये उघडली. लाहोर हे आपल्या संस्थेचे प्रमुख केंद्र बनवले. हिंदी भाषेचा जोरदार पुरस्कार केला. वेदभाष्य आणि सत्यार्थप्रकाश हे आर्यसमाजाचे धर्मग्रंथ होत. ते दोन्ही त्यांनी हिंदीतच लिहिले. वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन घडविण्यात या दोन्ही ग्रंथांचा फार मोठा वाटा आहे.

सत्यार्थप्रकाशातील दयानंदांच्या विचारांची प्रखरता दुधारी आहे. एका अंगाने त्यांनी हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथांचे कठोर परीक्षण केले अन् दुसऱ्या अंगाने हिंदूंवर वेळोवेळी अतिक्रमण करण्याऱ्या विधर्मियांच्या धर्ममतांतल्या दोषांवरही तीव्र प्रहार केले. म्हणूनच भारताच्या इतिहासात दयानंदांचे स्थान महनीय ठरले आहे. 'शंकराचार्यांच्या नंतर भारतात दयानंदांहून अधिक योग्यतेचा वक्ता, पंडित आणि अनिष्ट गोष्टींचे निर्भयपणे खंडन करणारा दुसरा कोणी झाला नाही' असे श्रीमती ब्लॅव्हॅट्स्की यांनी स्वच्छ शब्दांत लिहून ठेवले आहे.

ख्रिस्ती आणि इस्लामी लोकांच्या धार्मिक आक्रमणाविरुद्ध उत्तर भारतातील हिंदूंना जागे करण्याचे श्रेयही दयानंदांनाच आहे. त्यांच्या उदया-

त्याच्यापुढे दत्त म्हणून उभे. बरोबर तीन-चार नोकर. आपल्या मुलाची ती फटिंग अवस्था पाहून त्यांना दुःखही झाले अन् क्रोधही आला. ते मूळशंकरला तडातडा बोलले. बोलता बोलता प्रेमाने गहिवरले.

मूळशंकरला तो सारा प्रकार असह्य झाला. त्याने पाय धरून वडिलांची क्षमा मागितली. ‘ उद्या आपल्याला घरी जायचं आहे ! ’ ते मूळशंकरला उद्देशून म्हणाले. त्यांनी नोकरांना बजावले, ‘ याच्यावर लक्ष ठेवा ! ’

रात्रौ नोकर मूळशंकरला मधे घेऊन झोपले. मूळशंकरवर हे एक मोठेच संकट होते. आता घरी जाणे म्हणजे चक्रव्यूहात सापडणे. आपल्या सर्व महत्त्वाकांक्षांचा मृत्यू डोळ्यांनी पाहणे. या विचारांनी त्याची झोप पार उडाली होती. तो पुनश्च पलायनाचा विचार करीत होता. सेवक निद्राधीन होण्याची वाट पाहात होता. त्यांना गाढ झोप लागली हे समजताच तो उठून बसला. त्याने सावधपणे कानोसा घेतला. सगळीकडे शांत अन् निर्धास्त आहे असे दिसून येताच त्याने हळूच तिथून पळ काढला.

सिद्धपुराहून मूळशंकर सरळ नर्मदातीरावर आला. तिथे त्याला पूर्णानंद नावाचे एक संन्यासी भेटले. मूळशंकराच्या विनंतीवरून पूर्णानंदांनी त्याला संन्यासदीक्षा दिली. दयानंद सरस्वती असे त्याचे नाव ठेवले. दयानंदांनी काही काल पूर्णानंदांच्या सान्निध्यात राहून बरेचसे शास्त्राध्ययन केले. पण त्यांचे समाधान होईना. शंका फिटेनात.

दयानंद मग तिथूनही निघाले. विंध्यपर्वतात हिंडले. हिमालयात गेले. तिथेही खूप भ्रमंती केली. त्यांना सर्व शंका फेडणारा, चित्ताला समाधान देणारा सद्‌गुरू हवा होता. पण तोच कुठे भेटेना.

मग ते हिमालय उतरले. मथुरेला आले. तिथे विरजानंद नावाचे एक संन्यासी होते. ते दोही डोळी अंध होते; पण ज्ञानचक्षूंनी डोळस होते. दयानंद त्यांना शरण गेले. त्यांच्यापाशी खूपसे शिकले. विरजानंदांची काही मते ठाम होती. त्यांना वेदांबद्दल परम आदर होता; पण पुराणांबद्दल

विलक्षण तिटकारा होता. वेदांनी सांगितला तेवढाच धर्म खरा; अन् पुराणांनी सांगितलेला धर्म म्हणजे सगळा फापटपसारा असे ते समजत. त्यांचा मूर्तिपूजेलाही प्रखर विरोध होता. आपले हे सारे तत्त्वज्ञान त्यांनी अध्यापनाच्या द्वारे दयानंदांच्या हृदयात ओतले. दयानंदांना ते पटले. ते प्रभावित झाले. गुरुचरणांना स्पर्श करून त्यांनी प्रतिज्ञा केली.

" गुरुदेव, यापुढे मी माझं सारं आयुष्य वेदप्रणीत धर्माची प्रतिष्ठा करण्यासाठी खर्च करीन ! वेदांच्या चरणी माझं जीवन अर्पण असो ! "

इ. स. १८७५ साली दयानंदांनी मुंबई येथे आर्यसमाज या संस्थेची स्थापना केली. आपल्या विचारांनाही संघटित रूप दिले. संस्थेच्या प्रचारासाठी भारतभर दौरे काढले. शिक्षणाचे माध्यमही हाती घेतले. समाजातर्फे त्यांनी अनेक ठिकाणी वैदिक विद्यालये उघडली. लाहोर हे आपल्या संस्थेचे प्रमुख केंद्र बनवले. हिंदी भाषेचा जोरदार पुरस्कार केला. वेदभाष्य आणि सत्यार्थप्रकाश हे आर्यसमाजाचे धर्मग्रंथ होत. ते दोन्ही त्यांनी हिंदीतच लिहिले. वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन घडविण्यात या दोन्ही ग्रंथांचा फार मोठा वाटा आहे.

सत्यार्थप्रकाशातील दयानंदांच्या विचारांची प्रखरता दुधारी आहे. एका अंगाने त्यांनी हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथांचे कठोर परीक्षण केले अन् दुसऱ्या अंगाने हिंदूंवर वेळोवेळी अतिक्रमण करण्याऱ्या विधर्मियांच्या धर्ममतांतल्या दोषांवरही तीव्र प्रहार केले. म्हणूनच भारताच्या इतिहासात दयानंदांचे स्थान महनीय ठरले आहे. ‘शंकराचार्यांच्या नंतर भारतात दयानंदांहून अधिक योग्यतेचा वक्ता, पंडित आणि अनिष्ट गोष्टींचे निर्भयपणे खंडन करणारा दुसरा कोणी झाला नाही’ असे श्रीमती ब्लॅव्हॅट्स्की यांनी स्वच्छ शब्दांत लिहून ठेवले आहे.

ख्रिस्ती आणि इस्लामी लोकांच्या धार्मिक आक्रमणाविरुद्ध उत्तर भारतातील हिंदूंना जागे करण्याचे श्रेयही दयानंदांनाच आहे. त्यांच्या उदया-

पूर्वी हिंदूंना जणू कणाच उरला नव्हता. कोणीही उठावे आणि हिंदूंना दडपावे. त्यांच्या धर्माची यथेच्छ निंदा करावी. देवता तोडाव्या, मंदिरे फोडावी आणि अब्रू, वित्त अन् जीवित यांच्यावर घाला घालून हिंदूंना बळजबरीने बाटवावे असा तिकडे विधर्मियांचा हैदोसहुल्ला चालू होता. हिंदू लोक हे सर्व अन्याय अन् ही सारी क्रूरता निमूटपणे सहन करीत. अशा या दीनदयनीय हिंदूंच्या मनात स्वत्व आणि स्वाभिमान जागृत करण्याचा उदंड प्रयत्न स्वामी दयानंदांनी केला. हजारो हिंदूंच्या हृदयात धर्मरक्षणासाठी प्रसंगी प्राणही देण्याची भावना चेतवली !



## माझ्या मुखाने भारत बोलतो

स्वामी रामतीर्थ हे रामतीर्थ होण्याच्या आधी तीर्थराम होते. त्यांचे तेच नाव होते. मात्र त्यांची विरक्ती आणि आत्मसंयम पाहून त्यांचे सहाध्यायी त्यांना गोस्वामी तीर्थराम म्हणत. तीर्थराम बी. ए. च्या वर्गात असतानाची गोष्ट.

तीर्थराम फारसी भाषेच्या वर्गात जात असत. एक मौलवी त्यांना फारसी शिकवीत असे. तीर्थराम फारसीत फर्डे बोलत, फर्डे लिहीत. मौलवीला आपल्या या शिष्योत्तमाचा अभिमान वाटे. पण एक दिवस कोणीतरी संस्कृताच्या वर्गात बसणारा विद्यार्थी तीर्थरामांना टोचून बोलला.

"ब्राह्मणाच्या घरी जन्म घेतलास; पण संस्कृताकडे पाठ वळवलीस. काय उपयोग तुझ्या इतर ज्ञानाचा ! 'ब्राह्मण्य' रक्षावे आदरे !"

तीर्थरामांना ते शब्द लागले. तो अंतर्मुख झाला. म्हणाला, 'खरेच आपले सगळे धर्मग्रंथ संस्कृत भाषेत आहेत. आपले रामायण-महाभारतही संस्कृतातच आहे. आपली महाकाव्येसुद्धा संस्कृतच. अन् आपण मात्र संस्कृत भाषेला अगदी पारखे. छेः! हे चांगले नव्हे. प्रत्येक भारतीयाला संस्कृताची तोंडओळख तरी हवीच....'

तीर्थराम दुसऱ्याच दिवशी संस्कृत भाषा शिकणाऱ्या पंडितजींच्या वर्गात जाऊन उभे राहिले. गुरुजींना म्हणाले.

"मला संस्कृतच्या वर्गात घ्या!"

गुरुजींनी तीर्थरामांची सगळी चौकशी केली अन् म्हटले,

"तू फारसीचा विद्यार्थी. तुला आजवर संस्कृताचा गंधही नाही. 'रामो हरिः' सुद्धा येत नाही. वर्गातल्या मुलांचा अभ्यास बराच पुढे गेला आहे. तुला त्यांच्या बरोबर जाता येणार नाही."

तीर्थराम हिंपुटी झाले; पण थोडाच वेळ! त्यांना माघार घेणे ठाऊक नव्हते. पराभव पत्करणे मंजूर नव्हते.

त्याच दिवशी संध्याकाळी त्यांनी कालिदासाचा रघुवंश विकत आणला आणि घडाघडा श्लोक पाठ करायला सुरुवात केली. टीकेवरून अर्थ लावण्याचा प्रयत्न सुरू केला. बुद्धी तीव्र; त्यामुळे ती गोष्ट त्यांना जमायला लागली. विभक्त्या समजू लागल्या. समास लक्षात येऊ लागले. असा काही दिवस हट्टाचा अभ्यास करून ते कॉलेजात संस्कृताच्या प्राध्यापकांच्या पुढे जाऊन उभे राहिले.

त्यांनी रघुवंशातले काही श्लोक शुद्ध अन् सुस्पष्ट म्हटले अन् त्यांचा अन्वयार्थही लावून दाखवला. गुरुजी थक्क झाले. म्हणाले,

"तुझी बुद्धी विलक्षण आहे. मी थक्क झालो. आजपासून तू माझ्या वर्गात बसत जा. तू पंडित होशील. त्या दिवशी मी तुला वर्गातून घालवून दिलं, ही माझीच चूक होती. मी आता प्रिन्सिपॉलसाहेबांच्याकडे तुझी

शिफारस करीन."

रामतीर्थांनी वेदान्ताची साधना केली. ते साधनेच्या पायऱ्या चढत चढत सिद्धीच्या शिखरावर पोचले. हृषीकेश येथे त्यांना ही सिद्धी लाभली. ते पुनश्च लाहोरला आले. त्यांचे लग्न झालेले होते. त्यांनी संसारही थाटला होता. पण त्यांचा संसार म्हणजे करनकऱ्याचा वसा होता. पैसे मिळविलेले असेच कुठे तरी घालवायचे. अर्थात चांगल्या कामातच. पण त्यामुळे घरप्रपंचाची दैना व्हायची. घरी कधी राहिले तर राहिले. नाही तर गेले निघून. आता तर काय ! संसार त्यांच्या वाऱ्याला पलकट झाला.

थोड्याच दिवसांत त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला व वानप्रस्थाश्रम स्वीकारला. वानप्रस्थाश्रम म्हणजे रानावनात राहणे. मन मानेल तसे, मनास येईल तितके दिवस राहायचे. लहर फिरली की पुढचा रस्ता धरायचा त्यांनी लाहोर सोडले आणि ते सरळ हिमालयातल्या टेहरी मुक्कामी आले. बरोबर पत्नी आणि दोन मुलगे यांनाही घेतले. तिथे गेले ते एका धर्मशाळेत उतरले. कसला उद्योग करायचा नाही की चार घरी भिक्षाही मागायची नाही. कोणी काही आणून दिले तर त्या कुटुंबाच्या मुखी दोन घास पडायचे. अन्यथा नित्याची एकादशी. सगळ्यांचेच हाल. हे तेवढे निजानंदात निमग्न !

एवढ्यात कलकत्याकडचे एक स्वामी तिथे पोचले. स्वामी रामनाथ असे त्यांचे नाव होते. रामतीर्थांच्या वानप्रस्थाची ही परवड त्यांनी पाहिली. आणि त्या कुटुंबासाठी दरमहा रु. १० चे धान्य अविच्छिन्न मिळेल एवढी तरतूद करून ते पुढे गेले. रामतीर्थांचे वैराग्य आळशी, बेजबाबदार माणसाचे वैराग्य नव्हते. त्या वैराग्याच्या कंदाला ज्ञानाचे अंकुर फुटले आहेत, हे त्यांनी ओळखले होते.

टेहरीला असतानाच एका रात्री तीर्थराम अचानक कुठे तरी पसार झाले. ते नाहीत असे समजताच त्यांच्या पत्नीने हाय खाल्ली. त्यातच ती आजारी

पडली. आणि त्या आजारातून बिचारी उठलीच नाही.

वयाच्या २८ व्या वर्षी तीर्थरामांनी शिखा-सूत्राचा त्याग करून संन्यास घेतला. ते तीर्थराम होते ते रामतीर्थ बनले. या संन्यासविधीचा त्यांना एवढा आनंद झाला, की त्या भरात त्यांची समाधीच लागली. त्यानंतर ते उत्तराखंडाच्या यात्रेला निघाले. या यात्रेत त्यांनी गंगोत्री, केदार, नारायण, इत्यादी क्षेत्रे धांडोळली. प्रत्येक ठिकाणी त्यांनी काही काळ क्षेत्रवास केला.

मग ते हिमालय उतरून मथुरेला आले. तिथे भारतधर्म महामंडळाचे अधिवेशन भरणार होते. रामतीर्थ हे त्या अधिवेशनाचे अध्यक्ष निवडले गेले होते. त्या अध्यक्षपदावरून त्यांनी वैदिक धर्माच्या पुनरुद्धाराचा महामंत्र उच्चारला. तिथून पुनश्च ते टेहरीला आले. आता त्यांनी टेहरी गावात न येता जंगलातच वास्तव्य केले. त्यांना आता जन आणि विजन दोन्ही सारखीच होती. तशा स्थितीत टेहरी संस्थानच्या राजेसाहेबांना जंगलातच त्यांचे दर्शन झाले. त्या तेजोमूर्तीला पाहता पाहताच ते प्रभावित झाले. त्यांनी आग्रह करून आपल्या राजवाड्यात त्यांना राहायला आणले. काही दिवसांनी बातमी आली, की जपानमधील टोकियो येथे सर्वधर्म-परिषद भरणार आहे. रामतीर्थांनी या संधीचा फायदा घ्यावा म्हणून टेहरीच्या राजेसाहेबांनी त्यांना जपानला पाठविले. रामतीर्थ तिथे गेले. पण तिथे धर्मपरिषद भरणारच नव्हती. ती सगळी अफवा होती. पण तिथे गेल्यासारखे ते स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी वेदान्त आणि हिंदुधर्म या विषयांवर काही व्याख्याने दिली. वेदान्त अंगी मुरलेला, धर्माचे रहस्य आकळलेले आणि अस्खलित इंग्रजी भाषा, यामुळे जपानमध्ये त्यांचा बराच नावलौकिक झाला. त्या वेळी छत्रे यांची सर्कस जपानमध्ये आपले खेळ करीत होती. छत्र्यांनी रामतीर्थांची भेट घेतली. ते स्वामीजींना म्हणाले, ‘ इथून आम्ही अमेरिकेला जाणार आहो. तुम्ही आमच्या बरोबर

येता काय? यावं अशी आमची विनंती आहे.'

रामतीर्थ म्हणाले, 'चला!' त्यांना काय! दाही दिशा त्यांच्याच. तिथे निरनिराळ्या शहरी त्यांची अनेक व्याख्याने झाली. तेवढ्यापुरते ते शहरात येत. उर्वरित सगळा वेळ कॅलिफोर्नियाच्या जंगलात घालवीत. तिथे कंद-मुळे, फळे, दूध, पालेभाज्या यांवरच ते आपली उपजीविका करीत. काही शिजवायचे असले तर लाकडेही स्वतःच तोडीत. त्यांच्या व्याख्यानांतील मूलभूत विचारांचा आणि त्यांच्या अमोघ वक्तृत्वाचा अमेरिकेत खूप गाजावाजा झाला. त्या वेळचे अमेरिकेचे अध्यक्ष रुझवेल्ट यांनाही वाटले, की या भारतीय संन्याशाची एकवार भेट घेतली पाहिजे. त्यांच्याशी थोडी बातचीत केलीच पाहिजे. आणि रुझवेल्ट स्वामीजींच्या मुक्कामावर जाऊन त्यांना भेटले. स्वामीजींनी अमेरिकेत अनेक ज्ञानसंस्था स्थापन केल्या.

अमेरिकेतून ते इजिप्तमध्ये गेले. तिथून भारतात आले. काही दिवस हरिद्वार येथे राहिले. भारतातही त्यांनी अनेक ठिकाणी व्याख्याने देऊन खरा वेदान्त उपदेशिला. स्वामीजी हे श्रेष्ठ धर्मसुधारक होते; पण त्यांची सुधारणा बाह्य नसून आंतरिक होती. ते म्हणत, जो आत्मोद्धार करतो तोच खरा सुधारक. जो वेदान्त रोजच्या जीवनात आणतो तोच खरा सुधारक. वेदान्त ही जगण्याची वस्तू आहे. ती पुस्तकात ठेवायची वस्तू नव्हे. त्यासाठी आचरण शुद्ध हवे. ज्याचे आचरण शुद्ध नाही अशा माणसाने वेदान्ताच्या लंब्याचवड्या कितीही गोष्टी केल्या तरी त्याच्या उपदेशामुळे कोणी दुर्जनाचा सज्जन होणार नाही. याउलट ज्याचे चित्त निर्मळ आहे, तो जरी मौन धरून बसला तरी त्याचे आचरणच इतरांना मार्गदर्शक ठरेल.'

रामतीर्थांनी अनेक विषयांवर अनेक ग्रंथ लिहिले होते. पण ते त्यांनी सगळेच्या सगळे गंगार्पण केले. ही अनासक्ती आणि हा लोकेषणेचा त्याग आश्चर्यकारकच म्हणावा लागेल.

हळूहळू ते भारताच्या जीवनाशी एकरूप झाले. ते म्हणत. 'जेव्हा मी चालतो तेव्हा भारत माझ्या संगे असतो. जेव्हा मी श्वासोच्छ्वास करतो तेव्हा भारत माझ्याशी एकरूप असतो. माझ्या मुखाने भारतच बोलत असतो. कारण मीच भारत आहे.'

या देशाचे भले व्हावे, तो समर्थ, स्वतंत्र आणि आत्मस्वतंत्र व्हावा, या विचारानेच रामतीर्थांचे संन्यस्त जीवन ओतप्रोत झाले होते.

३९
किशोर ९८

BVBK-0400039